मंगळवार, २० जून २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२७७

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●TUESDAY 20 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-277 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


चर्चेतली बातमी

## आयपीएस अधिकारी रवी सिन्हा नवे रॉ प्रमुख

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** छत्तीसगड कॅडरचे आयपीएस अधिकारी रवी सिन्हा नवे रॉ प्रमुख असतील. देशाची गुप्तचर संस्था रॉचे प्रमुख म्हणून रवी सिन्हा यांच्या नियुक्तीला केंद्रीय मंत्रिमंडळ समितीने मान्यता दिली आहे. रवी सिन्हा यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. रवी सिन्हा हे सामंत कुमार गोयल यांची जागा घेतील. सामंत कुमार गोयल यांचा रॉ प्रमुखपदाचा कार्यकाळ 30 जून रोजी संपत आहे. सामंत गोयल यांना सरकारने अनेक वेळा एक्सटेंशन दिलं होते. रवी सिन्हा हे मूळचे बिहारमधील भोजपूर जिल्ह्यातील आहेत. त्यांनी दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजमध्ये शिक्षण घेतलं आहे. 1988 मध्ये UPSC परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी म्हणून मध्य प्रदेश कॅडर प्राप्त केले. मात्र 2000 मध्ये, तत्कालीन अटलबिहारी वाजपेयी सरकारने मध्य प्रदेशातून छत्तीसगड राज्याची निर्मिती केली तेव्हा सिन्हा तांत्रिकदृष्ट्या छत्तीसगड कॅडरमध्ये गेले. संशोधन आणि विश्लेषण विंगची स्थापना 21 सप्टेंबर 1968 रोजी झाली होती. रामेश्वर नाथ काव हे पहिले प्रमुख होते. रॉ ही संस्था थेट पंतप्रधानांना अहवाल देते. गुप्तचर ऑपरेशन्स, शेजारी देशांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे हे RAW चे काम आहे. मुख्यत्वे पाक, चीनच्या कारवायांवर लक्ष ठेवून आहे.

# 'त्या' नोटांच्या वृत्ताचे आरबीआयने केले खंडन

## प्रिंटिंग प्रेसमधून रिझर्व्ह बँकेला दिलेली प्रत्येक नोट मोजली जाते

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : बाजारातून ५०० रुपयांच्या नोटा गायब झाल्याच्या वृत्ताचे आरबीआयने खंडन केले असून, केंद्रीय बँकेने याबाबत स्पष्टीकरण जारी केले आहे. अर्थव्यवस्थेतून मोठ्या प्रमाणात ५०० रुपयांच्या नोटा गायब झाल्या आहेत. त्यांची किंमत ८८,०३२.५० कोटी रुपये आहे, असा एका आरटीआय अहवालाचा हवाला देत मीडिया रिपोर्टमध्ये दावा करण्यात आला होता. परंतु आरटीआयमधून मिळालेल्या माहितीचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे असे झाल्याचे केंद्रीय बँकेने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. देशातील तीन प्रिंटिंग प्रेसमधून ५०० रुपयांच्या नोटांबाबत आरटीआय अंतर्गत दिलेल्या माहितीचा चुकीचा अर्थ लावला गेला आहे. रिझर्व्ह बँकेला प्रिंटिंग प्रेसमधून दिलेली प्रत्येक नोट मोजली जाते, असे केंद्रीय बँकेने म्हटले आहे. यासाठी मजबूत यंत्रणा आहे. आरबीआयने लोकांना अशा प्रकरणांत केवळ मध्यवर्ती बँकेने दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवण्याचा सल्ला दिला आहे.**

यापूर्वी आरटीआय कार्यकर्ते मनोरंजन रॉय यांनी काही प्रश्न विचारल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांमध्ये व्हायरल झाले होते. प्रतिसादात नवीन डिझाईन असलेल्या ५०० रुपयांच्या लाखो नोटा गायब झाल्याचे सांगण्यात आले. त्याची किंमत ८८,०३२.५ कोटी रुपये आहे. देशातील तीन प्रिंटिंग प्रेसने ५०० रुपयांच्या ८८१०.६५ दशलक्ष नोटा नवीन डिझाइनसह छापल्याचा दावा करण्यात आला होता, परंतु रिझर्व्ह बँकेला या नोटांपैकी केवळ ७२६० दशलक्ष नोटा मिळाल्या. एकूण ५०० रुपयांच्या १७६०.६५ दशलक्ष नोटा गहाळ झाल्या, ज्यांचे मूल्य ८८,०३२.५ कोटी रुपये आहे. RBI ची छापखाने बंगळुरू, देवास आणि नाशिक येथे आहेत. ५०० रुपयांची नोट सिस्टीममधून गायब झाल्याचे अनेक मीडिया रिपोर्ट्समध्ये आले आहे. हे पूर्णपणे चुकीचे आहे. मुद्रणालयातील माहितीचा चुकीचा अर्थ काढण्यात आला आहे. प्रिंटिंग प्रेसमध्ये ज्या काही नोटा छापल्या जातात, त्या पूर्णपणे सुरक्षित असतात. या बँक नोटांचे उत्पादन, साठवणूक आणि वितरण यावर आरबीआय संपूर्ण प्रोटोकॉलसह देखरेख ठेवते आणि यासाठी एक मजबूत यंत्रणा अस्तित्वात आहे.

**जेपीसीकडून नोटघोटाळ्याची चौकशी करा : नाना पटोले**

मोदी सरकारवर भ्रष्टाचाराचा एकही डाग नसल्याचा भाजपाचा दावा खोटा असून मोदी सरकार भ्रष्टाचारात बुडालेले आहे. आता आणखी एक घोटाळा उघड झाला असून २०१६–१७ या वर्षात ५०० रुपयांच्या ८८१० .६५ दशलक्ष नव्या नोटा छापण्यात आला परंतु आरबीआयकडे ७२५० दसलक्ष नोटाच पोहचल्या म्हणजेच ८८ हजार कोटी रुपये मुल्य असलेल्या १७६ कोटी नोटा गायब झाल्याची माहिती उघड झाली आहे. या नोटा कोणाच्या खिशात गेल्या? याची चौकशी संयुक्त संसदीय समितीकडून करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

यासंदर्भात टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, नाशिक, देवास आणि बंगलुरुच्या सरकारी छापखान्यात नोटा छापल्या जातात. नाशिक व देवास येथील नोटा छापणारे सरकारी छापखाने केंद्रीय अर्थमंत्रालयाच्या अखत्यारित येतात. सरकारी छापखान्यातून थेट रिझर्व्ह बँकेकडे जातात व नंतर बाजारात चलनात येतात, ही प्रक्रिया आहे. मग या नवीन ५०० रुपयांच्या नोटा गायब कशा झाल्या? या कारखान्यात छापलेल्या नवीन ५०० रुपयांच्या नोटांमध्ये घोटाळा झाला असून तब्बल ८८ हजार कोटी रुपये गेले कुठे? हा गंभीर प्रश्न आहे.

# आशियाई चॅम्पियन्सशिपमध्ये भवानीने जिंकले पदक

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** सीए भवानी देवी हिने तलवारबाजीमध्ये इतिहास रचलाय. आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये भवानी देवीने सध्याच्या वर्ल्ड चॅम्पियनचा पराभव करत भारताची मान उंचाव ली आहे. आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये भवानी देवीने एक पदक पक्के केलेय. या स्पर्धेत पदक पक्कं मिळवणारी भवानी देवी पहिली भारतीय तलवारबाज ठरणार आहे. टोक्यो ऑलम्पिकमध्येही भवानी देवीनं शानदार कामगिरी केली होती, पण पदक मिळवण्यात तिला अपयश आले होते. आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये भवानी देवीने प्रभावी कामगिरी केली. क्वार्टर फायनलमध्ये भवानी देवीने जपानच्या मिसाकी इमूरा हिचा 15-10 च्या फरकाने पराभव करत उपांत्य फेरीत आपली जागा पक्की केली. मिसाकी इमूरा तलवारबाजीत वर्ल्ड चॅम्पियन आहे. हिचा पराभव करत भवानी देवीने जगभरात देशाची मान उंचावली. या विजयासह आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये भारताचे पदक पक्के झालेय. भवानी देवीने आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये आपल्या कामगिरीने सर्वांनाच प्रभावित केलेय. भवानी देवीने संपूर्ण सामन्यात वर्ल्ड चॅम्पियनवर वर्चस्व मिळवले. मिसाकीला तिने सामन्यात कमबॅक करण्याची संधी दिलीच नाही. भवानी देवीचं आशियाई फेसिंग चॅम्पियनशीपमध्ये आतापर्यंत दमदार प्रदर्शन राहिलेय. क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी भवानी देवीने जापानच्या सिरी ओजाकी हिचा 15-11 असा पराभव केला होता. सिरी 2022 वर्ल्ड चॅंपियनशिपमध्ये ब्रॉन्ज पदक जिंकणाऱ्या संघाची सदस्य होती. भवानी देवीने आपल्या कामगिरीने सर्वांनाच प्रभावित केलेय. टोक्यो ऑलम्पिकमध्येही भवानी देवीनं शानदार कामगिरी केली होती, पण पदक मिळवण्यात तिला अपयश आले होते.

# 'आदिपुरुष'वर बहिष्कार घाला : कालीचरण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आदिपुरुषला ओपनिंग चांगलं मिळालं मात्र या सिनेमातली भाषा, प्रभू रामाचं चित्रण, सीतेच चित्रण, रावणाचे प्रसंग या सगळ्यावरच बहुतांश प्रेक्षकांनी आक्षेप घेतला आहे. या सिनेमावर बहिष्कार घाला अशी मागणी आता कालीचरण महाराजांनी केली आहे. आदिपुरुष या सिनेमातल्या दाखवण्यात आलेल्या घटना हिंदू विरोधी आहेत. तसंच देवाच्या चरित्राचा अपमान करणारे शब्द या सिनेमात वापरण्यात आले आहेत. हा संपूर्ण प्रकार निंदनीय आहे. हिंदूंच्या इतिहासाचे विकृतीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे हिंदूंनी या सिनेमावर बहिष्कार घातला पाहिजे अशी मागणी कालीचरण महाराजांनी केली आहे. आदिपुरुष हा सिनेमा मी पाहिलेला नाही. जे लोक या सिनेमाला पाठिंबा देत आहेत ते धर्मविरोधी आहेत. ज्यांना वाईट वाटते आहे ते धर्मप्रेमी आहेत. जे धर्मप्रेमी आहेत त्यांनी या सिनेमावर बहिष्कार घातला पाहिजे, असेही कालीचरण महाराजांनी म्हटले आहे.

# दिंडोरीतील १८ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची होणार पेरणी

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यात पावसाळ्यांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील कृषी विभागाने यंदाचे आपले खरीप हंगाम पेरणीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यावर्षी १८०००हेक्टर क्षेत्रावर खरीपांची पेरणी अपेक्षित असून त्यासाठी १३ हजार ४८५ क्विंटल बियाणे लागणार आहे. तर खरीप हंगाम यशस्वी व्हावा म्हणून मागील वर्षी २४ हजार ४३४ मे.टन खतांची मागणी नोंदवली होती. त्यामुळे यंदाच्या खत मागणीमध्ये आता मोठी वाढ होण्याची दिशा निश्चित केली आहे. त्यासाठी टप्प्याटप्याने खतांचा पुरवठा सुरू होणार आहे. २०२३ हे वर्ष " आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष " असल्याकारणाने तालुक्यातील दुर्लक्षित असणारे तृणधान्य जसे की नागली, वरई, ज्वारी, बाजरी, कोद्रा, सावा, राळा, या पिकांचे क्षेत्र वाढीकडे कृषी विभागाने मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी विविध पिकांचे प्रकल्प तसेच मिनीकिट्स वाटप देखील करण्यात येणार आहे. तसेच प्रमाणित बियाणे वितरण अंतर्गत भात, सोयाबीन या पिकांचे महाबीजचे बियाणे अनुदान तत्वावर शेतकऱ्यांना परमिट व्दारे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती तालुका कृषी विभागांने दिली आहे. सोयाबीन पिकांचा वाढता भाव बघता यावर्षी सोयाबीन पिक पेरणीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर वाढणार असा अंदाज वर्तवला जात आहे. तर मकाचे क्षेत्रात थोड्याफार प्रमाणात चढ-उतार होण्याची शक्यता आहे. तसेच तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी उन्हाळी बाजरी केली होती. परंतु खरीप हंगामात मात्र दरवर्षी तालुक्यात मात्र बाजरी क्षेत्रात लक्षणीय घट दरवर्षी पाहायला मिळत आहे.तसेच यंदा पावसाच्या आगमनांवर हे क्षेत्र वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मागील खरीप हंगामात मका हे पिक जोमाने आले. परंतु अस्मानी संकटांशी या पिकांवर अनेक संकटांची टांगती तलवार निर्माण झाली होती. परंतु यंदा मात्र पाण्याचे नियोजन चांगले असल्याने मका क्षेत्रात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मागील वर्षी मका पेरणी तालुक्यात साधारण पणे २३.१९% क्षेत्रात पेरणी झाली होती. त्यामुळे मकाचे बियाणे मागणी मध्ये वाढ होणार असल्याचे बोलले जात आहे. बियांणाच्या बाबतीत बाजरी व मका यांचे बियाणे बदलावे लागत नसल्याने ते बियाणे कमी प्रमाणात लागते.


**दुर्लक्षित तृणधान्य वाढीवर भर :**

यंदा तालुका शेतकी विभागाने नागली, वरई, ज्वारी, बाजरी, कोद्रा, सावा, राळा या दुर्लक्षित तृणधान्य पिक वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी पेरणी क्षेत्र राखीव ठेवण्याचे आवाहन ही केले आहे. मागील वर्षी बाजरीसाठी ७ .००, नागलीसाठी १८९ .००, वरई साठी २ .००, ज्वारी साठी२ .८०, इ .हेक्टर क्षेत्र निश्चित होते. परंतु यंदा मात्र या पिकांच्या पेरणीसाठी लक्षणीय वाढ होणार करण्यात येणार आहे.

दिंडोरी तालुक्यातील खरीप पेरणी हंगामाचे यंदाचे उद्दिष्टे तालुका कृषी विभागाने निश्चित केले असून ते क्षेत्र १८००० हेक्टर क्षेत्र इतके राहाणार आहे. त्यासाठी शेतकरी वर्गाला लागणारे बियाणे, खते यांची टंचाई भासणार नाही. यासाठी योग्य नियोजन निश्चित केले आहे. यावर्षी अल निनो च्या प्रभावामुळे पाऊस मान कमी असल्याकारणाने शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा पिक विमा काढण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. तरी तालुक्यातील शेतकरी वर्गाने या महत्त्वाच्या गोष्टी कडे दुर्लक्ष करू नये.

**विजय पाटील ( दिंडोरी तालुका कृषी अधिकारी )**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# तुम पुकार लो...




'तुम पुकार लो...'हे गीत कानावर पडलं की आठवण येते ती सदाबहार गीते देणाऱ्या हेमंतकुमारची. या आवाजात एक वेगळाच गोडवा आणि खुमारी आहे. साथ सत्तरच्या दशकात हेमंतकुमारच्या गाण्यांनी तरुणाईला वेड लावले होते. बीस साल बाद, खामोशी, नागीन, कोहरा यासारख्या त्यांच्या चित्रपटातील गाण्यांनी अफाट लोकप्रियता मिळवली होती. एखाद्या कार्यक्रमात एखाद्या तरुणाला किंवा तरुणीला गायला सांगितले तर हेमंतकुमारांच्या चित्रपटातील गाणी त्यांच्या सहजच ओठांवर येत. अशी प्रचंड लोकप्रियता मिळवणारा संगीतकार आणि गायक विरळा.
त्या काळात तरुण गायकांवर त्या वेळच्या प्रसिद्ध गायक असलेल्या कुंदनलाल सैगल यांचा जबरदस्त प्रभाव होता. कोणत्याही गायकाला आपण के एल सैगल यांच्यासारखे गावे , त्यांच्यासारखी लोकप्रियता मिळवावी असे वाटत असे. हेमंतकुमार देखील त्याला अपवाद नव्हते. साधारणपणे चाळीसच्या दशकात हेमंतदा मुंबईत आले आणि त्यांची भेट झाली ती प्रख्यात संगीतकार नौशाद यांच्याशी. सैगल यांचा प्रचंड प्रभाव असलेल्या हेमंतदा यांनी काही गाणी नौशाद यांना म्हणून दाखवली. हेमंतदा यांच्या गायकीवर नौशाद फिदा झाले आणि त्यांनी लगेच त्यांनी आपल्या चित्रपटांसाठी दोन गाणी गाऊन घेतली. 'शबाब ' चित्रपटातलं 'चंदन का पलना रेशम की डोरी' आणि 'इन्साफ की डगर पे' बच्चों दिखाओ चलके...' हे 'गंगा जमना' या चित्रपटातील गीत. ही दोन्ही गाणी लोकप्रिय ठरली. या गीतांनी हेमंतदा यांच्या चित्रपट कारकिर्दीची उत्तम सुरुवात करून दिली. १६ जून १९२० रोजी जन्मलेल्या हेमंतदांचे बालपण बंगालमधील एका खेडेगावात गेले. संगीताची आवड हेमंतदांच्या रक्तातच होती. लहानपणी गावात येणारी नाटके, संगीताचे, लोकगीतांचे कार्यक्रम म्हणजे त्यांच्यासाठी मेजवानीच असायची. अभ्यासात उत्तम गती असलेल्या हेमंतदांनी कोलकात्यात इंजिनिअरिंगच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतला. साहित्य क्षेत्रातही त्यांना रस होता. नाटक, कथा, कविता लेखनही त्यांनी केले. पण संगीताची आवड त्यांना स्वस्थ बसू देईना. ईश्वरदत्त प्रतिभेमुळे संगीत आणि गाणं त्यांच्या रोमारोमात होतं. शिक्षणात त्यांचं मन लागेना. संगीताच्या वेडापायी त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला आणि आपलं आयुष्य संगीतासाठी वाहून घ्यायचं ठरवलं. असं कुठलं तरी वेड डोक्यात घेतलेली माणसेच आयुष्यात काहीतरी करून दाखवतात.



## आनंदी पहाट

# प्रेमाची अनुभूती हीच अध्यात्माची प्रचिती

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अध्यात्म्यांच्या पाच वैशिष्ट्यांचा वरील प्रत्येक प्रकारात समावेश होत असतो. अर्थ, मूल्य, अतिक्रमण, स्वतःशी, इतरांशी, देव, सर्वोच्च शक्ती आणि पर्यावरण याच्याशी जोडणे, आणि जीवनातील वाढ करणे आणि प्रगती करणे ही ती वैशिष्ट्ये होत. आध्यात्म म्हणजे आपल्यापेक्षा मोठ्या गोष्टीशी अर्थपूर्ण संबंध शोधणे, ज्याचा परिणाम शांतता, विस्मय, समाधान, कृतज्ञता आणि स्वीकृती यासारख्या सकारात्मक भावनांमध्ये होऊ शकतो. आध्यात्मिक कल्याण हे आपल्या जीवनाच्या अर्थाशी आणि उद्देशाशी संबंधित असते. यामध्ये संस्कृती, समुदाय, आध्यात्म किंवा धार्मिकता यांच्याशी आपला संबंध समाविष्ट केलेला असू शकतो आणि आम्ही धरत असलेल्या श्रद्धा, मूल्ये, मानसिक धारणा आणि नैतिकता समाविष्ट करू शकतो. आध्यात्मिक व्यक्ती असणे ही बाब व्यक्ती असण्याचे समानार्थी आहे, ज्याचे सर्वोच्च ध्येय स्वतःवर आणि इतरांवर प्रेम करणे आहे. आपण सर्व एक आहोत ही त्याची खात्री, त्याला सर्वांच्या कल्याणासाठी कार्य करण्यास आणि कोणत्याही हानिकारक क्रियाकलापांपासून दूर राहण्यास प्रवृत्त करते. जीवनाचा र्थ जाणून घेणे हे बहुतेकांसाठी आध्यात्म महत्त्वाचे असण्याचे मुख्य कारण आहे. आध्यात्मवाद, काहीतरी पवित्रता शोधण्यासाठी, लोकांना एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करते. एक व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात यावर चिंतन केल्याने सर्वसाधारणपणे मानवी अस्तित्वाचा अर्थ काय याविषयी तुमचे ज्ञान वाढू शकते. अध्यात्मिक वास्तवाची मानवीभावना सर्व ज्ञात संस्कृतींमध्ये आहे. नैतिक आरोग्य म्हणजे एखाद्या व्यक्तीची योग्य आणि चुकीची जाणीव, नैतिक पद्धतीने वागण्याची त्यांची क्षमता प्रतीत करत असते.



आधुनिक केसरी

## शुद्ध अंतःकरणी | हरि नांदे ||

चित्त शुध्दीसाठी | आत्ममग्न व्हावे ||
चिंतनी रमावे | एकांतात ||१||
देह शुद्धीसाठी | इंद्रिया जपावे ||
संयमाने घ्यावे | लोकांतात ||२||
वासनेची बाधा | होऊ नये मना ||
साधनेची दैना | करू पाहे ||३||
स्थिर बुध्दी ज्याची | असे सर्वकाळ ||
तोच जाणे खेळ | प्रारब्धाचा ||४||
मित् भाषी व्हावी | नामामृत वाणी ||
शुद्ध अंतःकरणी | हरि नांदे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

भद्रां निद्रां दयार्द्रां त्वाम्
अनन्तामभयां शिवाम् | तापत्रयविनाशाय
दुर्गां देवीं नमाम्यहम् || २४ ||
कल्याणी, निद्रा, दयार्द्र, अनंता, अभया,
शिवा अशा तुला दुर्गा देवीला तीनही
तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

मन की चाल अनेक है,
कुटिल कुढंग कुभाव ।
लखत भेद सब सन्त हैं, धोखा में नहिं
आव ।।१५।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम
अध्याय) ०४/१०/१५

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
मन मायेच्या कुटिल, कुढंग आणि कुभावाने अनेक चाली असतात परंतु त्याच्या या सर्व रहस्यांना संत जाणतात. ते या फसवणाऱ्या मायेच्या कचाट्यात सापडत नाहीत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी


मित्रांनो आपण 40 व्या ओवीपर्यन्त आलो होतो. हा गुरूशिष्य संवाद अतिशय व्यापक आहे. खुप विचार करायला लावणारा आहे. काही काही वेळा तर हे असं असु शकतं ? असं अचंबित व्हायला होतं. "धन्य ते गुरू व धन्य ते शिष्य". या दशक आठव्या प्रवासापर्यन्त आपण आलो हाच तो समर्थांचा आशिर्वाद आहे असे मी समजते. काही अधिक ऊणे झाल्यास समर्थांची माफी मागून पुढच्या अभ्यासाला सुरवात करूया. वायू म्हणजे शक्तिचा खेळ आहे. सुक्ष्म शक्तिचा शोध घेत गेल्यास सुक्ष्मपंचभूतें याचं ठिकाणी पहायला मिळतात. सुक्ष्म शक्तिमध्ये पंचमहाभूते अत्यंत सुक्ष्म पणाने रहातात. आणि या शक्तिलाच मूळमाया असे म्हणतात. मूळमाया पासून होणारी माया आणि तिच्यातून निर्माण होणारे त्रिगुण हे सगळे पंचमहा भूतात्मक असतात. अष्ट्याप्रक्रुती पंचभूतांमध्ये तीन गुण मिळवले म्हणजे आठ प्रकार होतात. म्हणून "अष्ट्याप्रक्रुती"पंचभूतांचे मिळून आहे असे समजते. आपल्याला व्यवहारी जगात कसे वागावे यासाठी मित्रांनो समर्थ या ठिकाणी एक अगदी मोलाचा सल्ला देतात. समर्थाची आपल्याला शिकवण अशी आहे की आपण ती कधीही विसरू नये. समर्थ म्हणतात, कोणत्याही गोष्टीचा विचाराने शोध घ्यावा तसे न करता तिच्याबद्दल संशय धरणे वेडेपणाचे होते. आता यापुढचा अभ्यास अतिशय खोलवर विचार करून मांडला आहे. यासाठी मी सन्माननीय बेलसरे सरांना धन्यवाद देते. मूळमायेत असणारी अत्यंत सूक्ष्म पंचभूते त्रिगुणामुळे स्पष्ट दशेला येतात. त्यांना द्रुष्यरूप आल्यावर सगळी तत्वे निर्माण होतात. त्यानंतरच्या तत्वाचा विचार आहे पिंड व ब्रम्हांडामध्ये जी तत्वरचना आहे तो लोकोपयोगी आहे आणि तो त्यांच्या नेहमीच्या परिचयाचा आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# हीन देह आणि ताठा । अप्रमाण आणि फाटा ॥

आधुनिक केसरी



असा हा ताठा अहंकाराच्या पुढची एक पायरी आहे. एक तर आयत्या संपन्नतेने हा ताठा येतो किंवा काहीच नसले तरी येतो. धुण्याची काठी जशी सरळ आणि ताठ असते. तिचे काम फक्त धुणे वाळत घालणे किंवा इतरांना मारणे. तसेच ताठा असलेली व्यक्ती इतरांना तुच्छ समजून वागत असते. शाब्दिक बाण विनाकारण चालवत असते. एखादा शिकलेला माणूस स्वतःविषयी व शिक्षणाविषयी इतका भ्रम बाळगून असतो की अमुक इतकाच पगार मिळाला तर मी नोकरी करीन. अन्यथा नाही आणि या आडमुठे पणामुळे दुसऱ्याच्या जीवावर आयुष्यभर बसून खावे लागते. तसेच एखादा गरीब आई बापाचा मुलगा थोडासा शिकला तर हलकी कामे, मजुरीची कामे करायला तयार होत नाही. जुने मालगुजार किंवा जमीनदार यांची मुले संपत्ती संपेपर्यंत बसून खातील पण कामे करणार नाहीत. हा ताठा आहे. आपल्या रोजच्या आयुष्यात हा ताठा अनुभवायला मिळतो स्वतःच्या गाडीने मुलाला शाळेत सोडल्यावर रस्ता क्रॉस करून मग गाडी लॉक करणे हा ताठा. जिथे गाडी पार्क केली तिथेच लॉक केली असती तर काही बिघडले नसते. पण पलीकडे पर्समधून किल्ली काढून लॉक केली तर लोक पाहतात. हा दिखाऊपणा म्हणजे ताठा. एखाद्या मोठ्या फंक्शनमध्ये एखादी स्त्री स्वतःच्या वेशभूषेने इतरांचे लक्ष वेधून घेते. माझ्या परिचयातील एक स्त्री मला सांगत होती. यूएस मध्ये ना जीन्सच घालावी लागते. खूप थंडीअसते. ( माझ्या मोठ्या जाऊ बाई कायम साडीतच अमेरिकेत वावरल्या. ) आणि घरी आजकाल मी ड्रेसच घालते बाई. साडी फक्त समारंभातच नेसते आणि नल्ली किंवा कलानिकेतन मधूनच घेते. जसे इतरांना या दुकानांमध्ये भारी साड्या असतात हे माहीतच नाही. अशावेळी वेड पांघरून पेडगावला जावे. एखाद्यावेळेस कुठे गेले तर आमची मुलं ब्रँडेड कपडेच घालतात. पंचतारांकित हॉटेलमध्येच जातात, फ्लाईट शिवाय प्रवासच करत नाहीत हे ऐकावे लागते. दुसऱ्याला तुच्छ समजण्यात या लोकांना आनंद मिळतो. आम्ही कसे वेगळे हे दाखवायचे असते. आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी असा अनुभव आला असेलच. आमच्या घरी हे चालत नाही ते चालत नाही असे दाखवणे म्हणजेही ताठाच. हा नव श्रीमंतीतून आलेला ताठा आहे गर्भश्रीमंत, सुशिक्षित, सुसंस्कृत माणूस नेहमी साधा सरळ वागतो. रतन टाटा, सुधा मूर्ती यांची उदाहरणे डोळ्यासमोर आणावी. विद्या विनयाने आणि संपन्नता दानाने सिद्ध होते. संपत्तीचा दिखावा सुख देणार नाही.सगळे नावे ठेवतील. संपन्नते बरोबर आपली बौद्धिक व वैचारिक पातळी वाढवावी. हा असण्याचा किंवा नसण्याचा गर्व, अहंकार सद्गुरुचरणी सोपवावा.जै काही आपल्याला या जन्मात मिळते आहे ते आपल्या पूर्वजन्मीचे संचित आहे. या जन्मी सद्गुरुंवर विश्वास ठेवून आपली वर्तणूक सरळ साधी असावी.योग्यता नसतानासुद्धा पुष्कळ वेळा संपन्नता असते हे लक्षात ठेवून विनयशीलता, श्रद्धा आणि भक्ती, दानधर्म वाढवायचा प्रयत्न करावा.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

युक्तियुक्तं प्रगृह्णीयात् बालादपि विचक्षणः
। रवेरविषयं वस्तु किं न दीपः प्रकाशयेत् ॥
स्पष्टीकरण - एखादे वेळी लहान मूल (आणि मूर्ख मनुष्य ) सुद्धा काही शहाणपणाचे बोल बोलून जाते. अशा वेळी मूल म्हणून किंवा मूर्ख म्हणून त्या बोलांचा अनादर करू नये. त्या बोलातले शहाणपण तेवढे घ्यावे. ते फायद्याचे ठरते.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २० जून २०२३



**डॉ.भास्कर बडे: शेतीमातीच्या व्यथा मांडणारा सृजन!**

पान ७



**आंबेडकरवादी नेत्यांनी स्वप्नातून बाहेर यावे**

पान ८



बीडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी शुक्रवार, दि.१६ जून रोजी लोकमत मीडिया ग्रुपचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवार्ड मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी इतिहास संशोधक डॉ.सतीश साळुंके, संपादक संतोष मानुरकर, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी, अल्पसंख्याक आघाडीचे सलिम जहांगीर, देविदास नागरगोजे आदी उपस्थित होते.

# पावसाने मारली दडी, बळीराजा चिंताग्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** सध्या मार्केटमध्ये शेतकरी आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी बुक स्टॉलवर आणि वर्तमानात काळ्या आईची मशागत करण्यासाठी बी बियाणांच्या दुकानावर गर्दी करत आहे. मात्र मृग नक्षत्रात पावसाने दडी मारल्यामुळे बळीराजा चिंताग्रस्त असून त्याच्या नजराआभाळाकडे लागलेल्या आहेत.

राज्यात मृग नक्षत्रात पाऊस येईल, या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी नित्यवर्षा प्रमाणे नांगरणी, वकरटी केली, शेतातील केरकचरा वेचून आपली शेती सज्ज ठेवली आहे.परंतु, पाऊसच होत नसल्याने जमिनीत ओलावा नाही. कोरडया मातीत बी कसे पेरायचे हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

पंजाबडखसह हवामान खात्याने मागील आठवड्यातच मान्सून सक्रिय होईल, असा अंदाज वर्तवला होता.मात्र बिपरजॉय चक्रीवादळाने केरळच्या सीमेवर आलेला मान्सून निष्क्रिय झाल्याचे हवामान खात्याचे अंदाज आहे.

पूर्वी मृग नक्षत्रात पेरणी व लागवडीसाठी आवश्यक असणारे पाऊस हमखास जून मध्ये पडत होते. त्यामुळे खरीप हंगामातील पेरणी वेळवर होत होती. याचा फायदा म्हणजे पीक वेळवर येऊन रब्बी हंगामासाठी शेती सज्ज राहत होती.

मात्र अलीकडे जून महिन्यात मुबलक पाऊसच होत नाही. थोड्याफार पावसावर पेरणी झाली तरी पुन्हा पाऊस झाला नाही तर दुबार पेरणीचा धोका निर्माण होत आहे.यंदा तर पाऊसच रेंगाळल्याने बळीराजाच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात जवळपास तीस हजार हेक्टरवर खरीप हंगामातील पेरणीचे नियोजन आहे. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तुरीचा पेरा सर्वाधिक असणार आहे. तर उडीद, मुगाची पेरणी त्या तुलनेत अल्प प्रमाणात होणार आहे.

८० ते १०० मिलीमीटर पावसानंतरच पेरणी करावी. कमी पावसात जमिनीत ओलावा कमी प्रमाणात असतो. त्यामुळे पेरणी उलटण्याची शक्यता असते. म्हणून शेतकऱ्यांनी सध्या पेरणी करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

१) शेतकऱ्यांनी घरच बियाणं पेरत असाल तर बीज प्रकिया उगवणी शक्ती तपासूनच पेरणी करावी .
२) विकत घेतलेल्या बियाणंच्या उगवणी शक्तीत जर काही कमतरता वाटली तर कृषी विभागाशी संपर्क साधावा .
३) सोयाबीन टोकन यंत्राचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा .महा डिबीटीवर सोयाबीन टोकन यंत्रासाठी १० हजारापर्यंत अनुदान आहे . या यंत्राद्वारे पेरणी केल्यास दुप्पट उत्पादन येते .
४) यंदाच वर्ष कमी जास्त पावसाचं वर्ष आहे असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे . त्यामुळे शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त सोयाबीन हे बेडवर पेराव .कारण यामुळे जास्त पाऊस झालं तर ते पाणी बेडवरून निघून जाईल, कमी झालं तर त्या मोरीत पाणी मुरल जाईल .याचा फायदा पिकाला होईल .

**सुरेंद्र पवार, कृषी अधिकारी, धर्माबाद .**

दरवर्षी प्रमाणे यंदा ही पावसाने दडी मारली आहे . शेतकऱ्यांना शेती आणि माती हेच त्याच्या कष्टाच साधन आहे . मात्र जर पावसाने साथ नाही दिली तर त्याच्या कष्टावार पाणी फेरल जात . बळीराजा कोप नाही वृष्टी होऊ दे .

**प्रगतिशील शेतकरी दिगंबर पाटील, जगदंबे पिंपळगावकर**

सध्या पावसाने दडी मारल्यामुळे पेरणी उशिराने होणार आहे . पेरणी थोडी उशिरा झाली तरी चालेल पण दुबार पेरणी टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी मुबलक पाऊस पडण्याची वाट बघावी . तसेच बी बियाणं सावधपणे निवडावं .

**प्रगतशील शेतकरी नारायण पाटील पवार रामपूर**



# पंतप्रधांनाच्या 'मन की बात' मध्ये निफाडच्या शुभमचा उल्लेख

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारती पवार यांनी कसबे-सुकेणे ता.निफाड येथे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांची 'मन की बात' कार्यक्रम पंचक्रोशीतील सर्व नागरिकांसोबत ऐकला.

या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्रजी मोदीजी यांनी कसबे सुकेणेचे भूमिपुत्र शुभम भंडारे यांना गोल्ड मेडल मिळाल्याबद्दल कौतुक केले. यावेळी भारतीताई पवार यांचे हस्ते शुभम व त्याच्या मातोश्री यांचा सत्कार करण्यात आला. 'मन की बात' या कार्यक्रमानंतर मंत्री महोदयांनी तालुक्यातील समस्या जाणून घेतल्या. यावेळी 'टिफिन बैठक' ही पार पडली. प्रत्येकांनी आपापल्या घरून आणलेल्या जेवणाच्या डब्यातील पदार्थांची देवाण घेवाण करून भोजनाचा आस्वाद घेतला. या बैठकीत मोदींजींच्या सेवा, सुशासन, गरीब कल्याण आदी विषयांवर नागरिकांचे मत जाणून घेण्यात आले. याप्रसंगी यतीन कदम, बापू पाटील, सतीश मोरे, प्रशांत घोडके, बाजीराव भंडारे, आनंदराव भंडारे, अमोल भंडारे, नाना भंडारे, सुदाम जाधव, विजय औसारकर, केशव भंडारे, लक्ष्मण भंडारे, शिवा गडाख, कृष्णा कव्हात, स्मिता कुलकर्णी, पप्पू भंडारे, अनिल भंडारे, भाऊसाहेब भंडारे, माधव भंडारे, भाऊसाहेब भंडारे, जाधव, सुदाम वाघ, रामदास भंडारे, नामदेव भंडारे, योगेश चौधरी, संजय गाजरे, प्रशांत गोसावी, प्रांत शुभांगी पाटील, तहसीलदार शरद घोरपडे आदींसह असंख्य नागरिक उपस्थित होते.



# शिवशक्ती आश्रमाची वृक्षदिंडी; तुपेवाडी ते पंढरपूर वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** येथून जवळ असलेल्या शिवशक्ती आश्रमाच्या माध्यमातून तुपेवाडी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यात परमपूज्य खडेश्वरी बाबांच्या पुढाकारातून वृक्षरोपण मोहीम हाती घेण्यात आली असून त्यास वारकरी व ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शिवशक्ती आश्रम तुपेवाडी ते पंढरपूर दरम्यान हजारो कलमांचे वृक्षारोपण करून संवर्धनाचा संकल्प करण्यात येत आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगातून वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे असे वृक्षाचे महत्व पटवून दिले आहे. परंतु दिवसेंदिवस वृक्षाची मोठ्या प्रमाणात अवैधरित्या कत्तल होत असून यातून जंगलातील असंख्य वनस्पती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे त्याचे विपरीत परिणाम मानव जातीस भोगावे लागत आहेत. वृक्षरोपण मोहिमेसाठी शासन पुढाकार घेत असुन अनेक सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, शाळा, महाविद्यालय या माध्यमातून वृक्षारोपण केले जाते. परंतु हे सर्व प्रयत्न अपुरे पडत असल्याचे दिसून येते. असले तरी एक विधायक कार्यक्रम म्हणून प.पु. खडेश्वरी बाबांनी तुपेवाडी ते पंढरपूर पायी दिंडीसोहळ्यात वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला आहे. पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यात दिंडी ज्याठिकाणी मुक्कामी थांबते त्या ठिकाणी ग्रामस्थांच्या मदतीने शाळा मैदान, मंदिर परिसर तसेच मोकळी जागा आणि सार्वजनिक ठिकाणी वृक्षरोपण करण्यात येत असून स्थानिक नागरिकांना वृक्ष संवर्धन करण्याची जबाबदारी देण्यात येत आहे. यासाठी प.पू.खडेश्वरी बाबांनी कडुलिंब, पिंपळ, जांभूळ, वड, यासारख्या स्वदेशी जातींच्या वृक्षांची लागवड करून पायी दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून पर्यावरण संदर्भात जागृती करण्याचा प्रयत्न केला आहे.त्याच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून अनेकांना वृक्ष लागवडीची प्रेरणा मिळत आहे.



# बेल्लूरमध्ये भरधाव वाहनाने महिलेला उडवले

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** नागपूर राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी ( ता.१९ ) पहाटे



बेल्लूर ( बू ) रोडवर अश्विनी नागनाथ भूमकर या महिलेला एका बेभान वाहनाने उडविल्यामुळे या महिलेचा जागीच मृत्यू झाला.यामुळे त्यांच्या कुटुंब व गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. धर्माबाद शहराच्या चोहोबाजूनी चकचकित व गुळगुळीत रस्ते होत आहेत. परिणामी वाहनांची वर्दळ तर वाढली आहेच. पण हे वाहनचालक ही बेभान गाड्या चालवीत आहेत.यातून अपघाताच्या प्रमाणात चिंतनीय स्वरूपाची वाढ झाली आहे. येताळा रोड, बासर रोड व बेल्लूर रोड जणू मृत्यूचे सापळे बनत चालले आहेत. सोमवारी पहाटे अश्विनी नागनाथ भूमकर ( वय २८ ) ही महिला वॉकिंगसाठी गेली होती. मात्र एका अज्ञात व भरधाव वाहनाने उडविल्यामुळे त्या महिलेचा जागीच मृत्यू झाला. ही घटना कळताच गावकरी आक्रमक झाले होते. जो पर्यंत गुन्हा नोंद होऊन वाहन चालकाला पकडले जात नाही, तो पर्यंत प्रेत उचलणार नाही अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली होती. सदर प्रकरणी पोलासांनी हस्तक्षेप करत धर्माबाद पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन व चालक विरुद्ध भा. दं.वी. कलम २७९, ३०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हेड काँ.मुनलोड हे करीतआहेत. सदर महिलेचा विवाह पाच वर्षांपूर्वी नागनाथ भूमकर यांच्याशी झाला होता. त्यांना एक चार वर्षाचा मुलगा आहे.

# उतरती कळा

आधुनिक केसरी

अमेरिकेत समलिंगी संबंधांना पाठिंबा देणाऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे. पाठिंबा देणाऱ्याचे हे प्रमाण ७१ टक्क्यांवरुन ६४ टक्क्यांवर घसरले आहे. गॅलप पोलने याबाबतचा सर्व्हे केला आहे. एक वर्षापूर्वी ७१ टक्के अमेरिकन्स हे समलिंगी संबंधांना पाठिंबा देत होते. मात्र ते प्रमाण आता ६४ टक्के इतके घसरले आहे असे या पोलच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. अमेरिकेतल्या विविध राज्यांमध्ये राहणाऱ्या प्रौढ व्यक्तींशी चर्चा करुन हा सर्व्हे तयार करण्यात आला आहे. साधारण विविध प्रकारच्या १ हजार लोकांशी या सर्व्हेसाठी चर्चा करण्यात आली. त्यानंतर याविषयीचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. हा पोल घेणाऱ्या गॅलप या संस्थेने म्हटले आहे की सर्व्हे करताना आम्हाला असे लक्षात आलं की अमेरिकेतले नागरिक हे लैंगिकता आणि त्या विषयाशी संबंधित अनेक मुद्द्यांना देत असलेला पाठिंबा कमी करत आहेत. यामध्ये जन्मदर नियंत्रण हा मुद्दाही समाविष्ट होता. ८८ टक्के अमेरिकी नागरिकांनी हा मुद्दा स्वीकारला. २०२२ मध्ये हे प्रमाण ९२ टक्के होते. मेरिकेतल्या नागरिकांनी समलिंगी संबंधांना समर्थन देणे कमी केले आहे. अमेरिकेत हे संबंध नैतिकदृष्ट्या स्वीकारार्ह आहेत. मात्र या संबंधांना समर्थन देणाऱ्या अमेरिकी नागरिकांचे प्रमाण हे सात टक्क्यांनी घटले आहे. LGBTQ व्यक्तींच्या अधिकार आणि हक्कांविषयी अमेरिकेचं धोरण उदारमतवादी राहिल्याचेच दिसून आले आहे. २००२ मध्ये ३८ टक्के अमेरिकन नागरिकांचे म्हणणे हे होत की सेम सेक्स संबंधांमध्ये गैर काहीच नाही. त्यानंतर या संबंधांना समर्थन देणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले. तर २०१९ मध्ये हे प्रमाण ६४ टक्के इतके होते. २०१९ मध्ये या सगळ्यांनी सामाजिक दृष्ट्या हे संबंध स्वीकारले त्यात गैर काही नसल्याचे मत व्यक्त केले होते. News week ने याविषयीचे वृत्त दिले आहे. गॅलप पोलच्या सर्व्हेनुसार रिपब्लिकन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ५६ टक्के लोकांनी २०२२ मध्ये समिलिंगी संबंध ठेवणाऱ्या व्यक्ती नैतिकदृष्ट्या योग्य आहेत. यावर्षी हे प्रमाण ४१ टक्के इतके आहे. २०१४ च्यानंतर समलिंगी संबंधांना समर्थन देण्याचे हे प्रमाण सर्वात कमी आहे. २०१४ मध्ये हे प्रमाण ३९ टक्के इतके होते.



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

# खा.संजय राऊत असं का बरं वागतात ?


आधुनिक केसरी

**संजय राऊत राज्यसभा खासदार, दैनिकांचे संपादक तथा ठाकरे शिवसेनेचे प्रमुख नेत्यापैकी ओळखले जातात. मुळ शिवसेनेला भगदाड पडण्याअगोदर राज्यात अस्तित्वात असलेली तत्कालिन भाजप-शिवसेना महायुती फोडण्यात त्यांचा सिंहाचा वाटा नाकारून चालणार नाही. महाविकास आघाडीचं सरकार ज्यासाठी राऊतांनी सिल्वर ओक बंगल्यावर स्वत:सहित नेतृत्वाचं पायपुसणं स्विकारलं. एकनाथ शिंदे 40 आमदारांना सोबत घेवुन बाहेर पडल्यानंतर शिल्लक शिवसेना टिकवण्यासाठी राऊतांची धडपड कमी लेखुन चालणार नाही. पण काही गोष्टी त्यांच्या स्वभावातुन महाराष्ट्राला कळुन चुकल्या.**

सतत आरोप करणे, द्वेषाचे राजकारण करून विरोधकांची टिंगलटवाळी करणे, खोटं बोल पण रेटुन बोलणे, जगावेगळं माझ्याकडे ब्रह्मज्ञान असल्याचा आव आणुन सनसनाटी निर्माण करणे, कधी थुंकण्याचा बालिशपणा तर आता नविन घडवुन आणलेलं प्रकरण त्यांच्या अंगलट आलं. धमकी प्रकरण स्वतःच्या कार्यकर्त्याकडून घडवलं त्याचं पितळ अखेर उघडं पडलं. कारणही सत्य कधी लपुन रहात नाही असं म्हणावे लागेल. प्रश्न हाच पडतो की खासदार असलेले संजय राऊत असं का बरं वागतात ?
राजकारणात खोटारडेपणा चालतो का ? त्याचं उत्तर हो असलं तरी अशा स्वभावाची राजकारणी कधीच लोकांची मनं जिंकु शकत नाहीत. एकदा खोटं बोलणं पचनी पडेल पण रोज मिडियाच्या थोबाडासमोर जायचं आणि नको ते आरोप करत बेछुट बोलायचं अशांचा चेहरा आम जनतेच्या दृष्टीने किळसवाणा ज्याकडे बघावसं वाटत नाही असा होवुन बसतो. त्यापैकीच एक नेते राऊत म्हटलं तर वावगं वाटणार नाही. राऊत हे स्वतःला ब्रह्मज्ञानी समजतात हीच फार मोठी त्यांची राजकिय अडचण होऊन बसली हे त्यांच्या अधुनमधुन खोटारडेपणावरून सिद्ध झालं. गंमत बघा, भाजप-शिवसेना यांची बावीस वर्षाची महायुती होती. त्यात मिठाचा खडा टाकण्याची जबाबदारी 2019 ला राऊताकडे निश्चित जाते. काय तर म्हणे मुख्यमंत्री पदाचा शब्द आम्हाला मातोश्रीवर येवुन सद्याचे गृहमंत्री अमितभाई शहा यांनी दिला. हे राऊताचं पहिलं खोटं राजकीय भांडवल लोकांनी पाहिलं. अर्थात मुख्यमंत्री पदावर उद्धवजी ठाकरे यांना बसवायचं होतं तो भाग वेगळा. याचसाठी केला होता अट्टाहास महाविकास आघाडीची निर्मिती त्यातुन सरकार स्थापना कदाचित त्यांची भीष्मप्रतिज्ञा पुर्ण झाली. दोन-अडीच वर्षे त्यांचा कारभार जनतेनं पाहिला. सत्तेचा गैरवापर, विरोधकांना जेलमध्ये टाकणे, व्यक्तिस्वातंत्र्यावर दबाव टाकणे, अगदीच म्हटलं तर संपादक देखील त्यांनी जेलमध्ये टाकले. केंद्रिय मंत्री नारायण राणे यांना रात्रभर अटक करून ठेवले. कदाचित आपल्याच कर्माची फळं याचि देहि, याचि डोळा ते भोगताना दिसत असले तरी त्यांच्या कर्माने महाविकास आघाडी सत्तेतून पायउतार झाली. सांगण्याचा हेतू



आहे की, राऊत असं का वागतात ? एकनाथ शिंदे त्यांच्यातून बाहेर पडले. गंमत बघा, एकाच वेळीस 40 आमदार बाहेर पडणे याची सर्वस्वी जबाबदारी खरं तर नेतृत्व आणि त्यांच्या बगलबच्चावरच जाते त्यापैकीच एक शिलेदार संजय राऊत म्हणावे लागतील. पण शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासुन त्यांची बिथरलेली मानसिकता खऱ्या अर्थाने अधुनमधुन स्वभावाची स्पष्टता जनतेसमोर येते. ज्या राहुल गांधींना अपरिपक्व नेतृत्व म्हटलं त्याच राहुल गांधींना भेटण्यासाठी हे महाशय भारत जोडो यात्रेत काश्मिरला गेले. कधी शरद पवारांना नेतृत्वाची क्षमता म्हणणं तर राहुल गांधींचा अपमान करणं एवढेच नव्हे तर एकीकडे हिंदुत्वाचे पाईक स्वतःला समजून घेणं पण ज्या राहुल गांधींनी खालच्या पातळीवर जावुन सावरकरांवर टिका केली त्याची आरती करायला हे मागे राहिले नाहीत. मुळात बेछुट आरोप करणं आणि खोटे बोलणं हे त्यांना व्यसन म्हणावे लागेल. मानसिक संतुलन यावर अनेकदा झालेले आरोप कदाचित त्यांनी स्विकारले.  पण काल परवाची गंमत बघा हा माणुस चक्क पत्रकारांच्या मांडीजवळ जाहिरपणे थुंकला. हे जे थिल्लर त्यांचं राजकारण ज्याची किव महाराष्ट्रातील जनतेला आली. असं आपण स्वतःला नेमकं काय समजतो ? बालवाडी शाळेत शिक्षण घेणारं लेकरूसुद्धा असा स्वतःच्या शरीराचा तमाशा करत नाही. पण आपण काहीही केलं ते लोकांना पटतं ही त्यांची मानसिकता खऱ्या अर्थाने सुसंस्कृत राजकिय चळवळ निर्माण होण्यासाठी आडसर ठरू शकते. एखादा राजकारणी जेव्हा कुणाच्या तरी नावावर आक्षेप घेत थुंकतो तो प्रकार खरंच कीव येण्यासारखा म्हणावा लागेल. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे मागच्या आठवड्यात जीवे मारण्याची धमकी त्यांना आल्याचं प्रकरण त्यांनी अगदी स्वतःच देश नव्हे तर आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत नेलं. खरं तर पोलीसांनी त्याचा छडा लावला पण धमकी आल्यानंतर राऊत बंधूंनी केलेला थयथयाट मग गृहमंत्र्यांची बदनामी आणि सरकारवर नको नको ते आरोप पण जेव्हा पोलीसांनी मयुर शिंदे नावाचा आरोपी पकडला आणि त्यातलं सत्य उघडकीस आणलं तेव्हा मात्र राऊतांना धमकी आली पण ती धमकी राऊतांनीच दिली होती. हे सत्य बाहेर आलं. मग आता मयुर शिंदे नावाचा आरोपी, त्याचे फोटो राऊत बंधु सोबत त्यांचाच तो कार्यकर्ता खरं तर आ.नितेश राणेंनी याचा भांडाफोड चांगला केला. पण खोटारडेपणाचा कळस किती असावा ? आणि उगीच आव आणुन आरडाओरड कसा करावा ? ज्याला आपण बिन पैशाचा तमाशा म्हणू जो करण्यासाठी राऊत बंधू यांनी महाराष्ट्राच्या राजकिय पटलावर थयथयाट केला. त्यामुळेच संजय राऊत असं का वागतात ? हा प्रश्न आता लोकांनाच पडला. मला धमकी आली तर मी कुणाला भित नाही. पोलीस संरक्षण मला नको. असं म्हणून त्यांनी स्वतःच्या टिऱ्या बडवून घेतल्या. पण डोंगर पोखरला तर उंदिरही निघाला नाही कधीकधी राजकारणात नौटंकी केल्यानंतर कशी अंगलट येते ? हे साऱ्या महाराष्ट्रानं पाहिलं. एक गोष्ट खरीच म्हणावी लागेल की संजय राऊतांच्या तोंडून बाहेर पडलेल्या एकाही शब्दांवर लोकांचा विश्वास बसू शकतच नाही. तो त्यांनी गमावून टाकलेला म्हणावा लागेल. कदाचित उद्धवजी ठाकरे यांचाही विश्वास बसत नसावा पण सद्या ते ज्या परिस्थितीतुन पुढे जाताना दिसतात त्यामुळे अशा सहकाऱ्यांना कदाचित ते बोलत नसावेत. संजय राऊतांच्या एकुणच राजकिय भुमिकेमुळे महाराष्ट्रातील राजकिय वैचारिक संस्कृती बिघडत चालली हा तर चिंतनीय विषय आहेच. कारण वैचारिकता आणि राऊतांची बुद्धी याचा ताळमेळ कुठेच बसु शकत नाही. कारण कोणत्या वेळेस ते काय बोलतील ? कुणावर बेछुट आरोप करतील ? खोटं बोल पण रेटुन बोल हे त्यांचं पडलेले अंगवळणी सुत्र आणि स्वतःलाच स्वतः धमकी देणं हा तर खऱ्या अर्थाने खोटारडेपणाचा कळस ज्याची किळस जनतेला आली यात शंका नाही. पोलीसांनी धमकी प्रकरणात मयुर शिंदे या आरोपीला अटक केली असुन आणखीन काही आरोपी पकडले पुढे जाताना पोलीस तपासात काही गोष्टी निश्चित बाहेर येवु शकतात. बाकी काही असलं तरी संजय राऊत असं का बरं वागतात ? हा प्रश्न न सुटे कधी.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!

आधुनिक केसरी

**आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!   पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती.**

त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली.

गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि ब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रामाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या



वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे  पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते.  आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# अतिक्रमणावर संयुक्त कारवाई

## पोलिस बंदोबस्तात प्रशासनाने काढले अतिक्रमण

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश कवडे**

**परतूर :** परतूर शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण बहुचर्चित होते. मुख्य रस्त्यावरिल वाहतुक कोंडीपासून कधी सुटका होणार असे प्रत्येकाला लाटत होते. आता शहरातील मुख्य रस्ता रेल्वे स्टेशन रोड ते परतूर पोलिस ठाणे हा मुख्य रस्ता असुन त्यावरील आष्टी गेट ते महादेव मंदीर चौक या परिसरातील रस्त्यावरील एका साईटचे प्रशासनाने संयुक्त कारवाई करत अतिक्रमन जेसिबिच्या सहाय्याने काढण्यास सुरुवात केली. शहरातील व्यापारी तसेच व्यापारी महासंघाने रातोरात व्यापाऱ्यांनी बैठका घेत सोशल मीडियातून विरोध दर्शविला. मात्र प्रशासनाच्या संयुक्त कारवाईने त्यांचा डाव हाणून पाडला, तसेच पोलिस बंदोबस्तात मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे पाडण्यास आज पासुन सुरुवात झाली असल्याने शहरातील मुख्य रस्ता महादेव मंदीर ते आष्टी गेट पर्यंत काही दिवासांपुरता रहदारीस बंद आसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे . तरी शदरील मुख्य रस्त्यावरिल अतिक्रमणे काढल्याने रस्त्याची रुंदी वाढणार असुन रस्त्यावरून वाहतूक सुरळीत होणार आहे. याचा शहरवासीयांना फायदाच भविष्यात होईल .

# लिहिण्याची ऊर्जा देणारा माणूस : डी.बी. जगत्पुरिया

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रख्यात कवी, समीक्षक चिंतक ज्येष्ठ पत्रकार डी.बी. जगत्पुरिया यांचा अमृत महोत्सवानिमित्त गौरव समारंभ मराठा सेवा संघाच्या जिजाऊ भवनात स्वातंत्र्यसैनिक बाबूलालजी भैया विचारमंचावर कौशल्यामाता सभागृहात संपन्न झाला. शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन जगत्पुरिया यांचा गौरव करण्यात आला . यावेळी बोलताना समीक्षक विचारवंत डॉ.राजकुमार मस्के म्हणाले 'डी. बी. जगत्पुरिया हे शांती क्रांती व उत्क्रांतीची साथ घेऊन भ्रांतीला मिटवत अंधार भंजन करणारे प्रकाशयात्री आहेत. प्रज्ञेचा सूर्य अंधारभंजक असतो. डीबी सर उजेडाची वाट चोखाळणारे महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांना आम्ही उजेडाचे प्रबुद्ध वारसदार मानतो.'

अनंत कदम यांनी डी.बी. जगत्पुरिया यांचा सत्वशील कसदार व अनेकांना लिहिण्याचे बळ देणारा लेखक म्हणून गौरवपूर्ण उल्लेख केला. हे करत असताना मातब्बर व हमशाही करणाऱ्यांनाही सरळ करण्याचे काम डीबींनी केले, असेही ते म्हणाले. माजी न्यायमूर्ती डी. आर. शेळके म्हणाले- पुरोगामी व परखड विचार मांडणारा लेखक समाजाला नेहमीच हवा असतो. लेखक खूप आहेत पण समाजाला आज डीबींसारख्या झणझणीत अंजन घालणाऱ्या लेखकांची गरज आहे. डीबी हे जीहुजूरी न करणारे परखड लेखक आहेत. 'क्रांतिकारी वडिलांचं रक्त माझ्या शरीरात आजही सळसळतं. तीच माझी खरी ऊर्जा आहे, असे सांगून डी.बी. जगत्पुरियांनी आपल्या दमदार आवाजात 'मातीची नाती' ही कविता सादर केली. मानवता हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी नम्रपणे सांगितले. शाहीर सी.के. मिस्तरी यांनी डीबींनीच लिहिलेले महाराष्ट्र गीत सादर केले. सौ. आशा मिस्त्री यांनी विमला जगत्पुरिया यांचा साडी, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यानिमित्ताने दिग्गज लेखकांचे लेख असलेले 'मानदंड ७५' तसेच 'लोकानुकंपा' व 'प्रज्ञावती 'एलीनॉर झेलीएट' या तीन पुस्तकांचे शानदार प्रकाशन करण्यात आले. पत्रकार रमेश दाणे यांनी जगत्पुरिया यांच्या स्वतंत्र व निर्भय वृत्तीवर भाष्य करून मानपत्राचे वाचन केले. या भव्यदिव्य सोहळ्याचे बहारदार सूत्रसंचालन विख्यात निवेदक जगदीश देवपूरकर यांनी केले. मंचावर बलराज पांडवे, शार्दुल दादा, डॉ. दाभाडे उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात डॉ. मिलिंद बागुल यांच्या अध्यक्षतेत डीबींच्या साहित्यावर परिसंवाद झाला. यात वक्त्यांनी त्यांच्या काव्य, स्तंभलेखन, समीक्षालेखन, नाट्यलेखन व नाट्याभिनय क्षमतेवर प्रकाश टाकला. परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद सिनकर यांनी केले.

प्रख्यात कवी विनय मिराशे यांच्या अध्यक्षतेत कवी संमेलन पार पडले. कवी धोंडीरामसिंह राजपूत, के.जी. त्रिभुवन, शमा बर्डे, विनोद सिनकर, गजानन सोनोने, नंदकुमार सोळंके, प्रवीण अहिरे इत्यादींनी आपल्या कविता सादर केल्या. गझलकार शिवाजी चौरे यांनी बहारदार ,वेधक सूत्रसंचालन केले.दिवसभराच्या या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून अनेक लेखक कवी, शिक्षक, आप्तेष्टमित्र,नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शार्दूलदादा, डॉ.विनोद सिनकर, डॉ.बलराज पांडवे, प्रा.पंजाबराव मोरे, निंबाजी मराठे, पंकज जयस्वाल, धीरज जयस्वाल, विजयसिंह सोळंके आदींनी परिश्रम घेतले.





# काँग्रेस कमिटीच्या शहर उपाध्यक्षपदी संजय कहाळेकर


आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहर काँग्रेस कमिटी कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून लोहा शहर उपाध्यक्षपदी संजय बापूराव कहाळेकर यांना नांदेड येथील पक्ष कार्यालयात एका भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. काँग्रेस कमिटी पक्ष कार्यालय नांदेड येथे दिनांक 19 जून रोजी लोहा शहर कार्यकारिणी घोषित करण्यात आली असून लोहा शहर उपाध्यक्षपदी उच्चशिक्षित, अभ्यासू, सक्रिय चळवळीतील पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते, जेष्ठ पत्रकार संजय बापूराव कहाळेकर यांना नियुक्तीपत्र देण्यात यावेळी राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, भास्करराव पाटील खतगावकर, नांदेड दक्षिणचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे, माजी मंत्री डीपी सावंत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आमदार अमरनाथ राजुरकर, संजय देशमुख लहानकर, बाळासाहेब देशमुख बारडकर, लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, लोहा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सोनुभाऊ संगेवार आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत युथ पत्र देण्यात आले. संजय कहाळेकर यांच्या निवडीबद्दल अनेक मान्यवरांकडून,कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# डॉ. चारुलता रोजेकर यांना यंदाचा 'क्रीडा भारती योग पुरस्कार'

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** क्रीडा भारती या खेळासाठी समर्पित संघटनेचा 'क्रीडा भारती योग पुरस्कार' यंदा डॉ. चारुलता रोजेकर यांना जाहीर झाला आहे. २१ जून रोजी जगभरात साजरा केला जाणाऱ्या जागतिक योग्य दिनाच्या निमित्ताने हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याची माहिती क्रीडा भारतीचे येथील प्रमुख पंकज भारसाखळे यांनी पत्रकाद्वारे दिली. डॉ. रोजेकर यांनी योग या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. याच बरोबर त्यांनी पत्रकारिता या विषयातही पदव्युत्तर शिक्षण प्राप्त केले आहे. ५२ हजार लोकांना त्यांनी आतापर्यंत आपल्या परिश्रमातून योग्य साक्षर केले आहे. याशिवाय त्यांनी योग विषयाच्या प्रचार प्रसारासाठी रेडियोवर ५५० पेक्षा अधिक भाषणे केली आहेत. याशिवाय १२०० पेक्षा अधिक लेखही डॉ. रोजेकर यांचे प्रसिद्ध झाले आहेत. हरसूल कारागृहातील कैद्यांसाठी योग अभ्यास वर्ग घेणाऱ्या त्या एकमेव योग शिक्षिका आहेत. समाजातील विविध घटकांसाठी त्यांनी योग्य वर्ग घेतले ज्याचा उपयोग त्यांना सामान्यांच्या दैनंदिन आयुष्यात बदल घडविण्यास झाला आहे. गर्भधारणा झालेल्या महिलांसाठी घेतल्या जाणाऱ्या त्यांच्या 'गर्भसंस्कार' वर्गाला मोठी पसंती मिळाली आहे.



अकरा हजार रुपये, शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार मंगळवार ( ता. २० ) रोजी हेडगेवार रुग्णालयातील दामूअण्णा दाते सभागृह येथे प्रदान केला जाणार आहे.




महाराष्ट्र Business Katta












# डॉ.भास्कर बडे: शेतीमातीच्या व्यथा मांडणारा सृजन!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**साहित्य समाजाचा आरसा असते. कथा, कविता, कादंबरी, नाटक आदि वाङ्मय हे त्या त्या काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक घडामोडींवर भाष्य करतांना नित्य जागृती करत असते. याच अनुषंगाने नव्या पिढीतील, एकविसाव्या शतकांतील बहुआयामी कवी, लेखक, कथा-कादंबरीकार, नाटककार, वावर प्रकाशन लातूरचे मालक, एका वाचनालयाचे सर्वेसर्वा, सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ.भास्कर बडे हे आपले लेखनाचे काम मोठ्या नेटाने करत आहेत. निवृत्तीनंतर एखादा माणूस आपल्या वयाला कवटाळून घरीच हरी हरी करत बसला असता, परंतु मुळातच बंडखोर वृत्तीचे असलेले कविवर्य डॉ.बडे सरांनी प्रत्यक्ष शेती करून त्यावर आधारित जिवंत अनुभव कथन करायचे ठरवले आहे.**

याचा परिपाक म्हणजे बडे सरांची लेखणी ही बीड जिल्ह्यासारख्या खडकाळ परिसरात शेतीमातीची कविता लिहून कविवर्य ना.धो.महानोरांचा वसा-वारसा मोठ्या ताकदीने चालवत आहेत. आज डॉ.बडे सरांचा ६३ वा वाढदिवस असतांना सर आपल्या लोणी गावाच्या वावरात ऊसाला पाणी देण्यासाठी शेतात मुक्कामी आहेत. सगळीकडे खडकाळ माळरान असतांना आपल्या शेतावर बडे सर सफरचंदाची लागवड करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर नवा आदर्श उभा करत आहेत. अलीकडच्या तीन दशकाच्या कालखंडात मराठी साहित्य विश्वात डॉ.भास्कर बडे हे मोठ्या सन्मानाने घेतलं जाणार नाव! एक व्यासंगी कवी, नामवंत कथा लेखकांपैकी बडे हे एक नाव आहे. डॉ,बडे हे केवळ कथा लेखक नसून आपल्या खुमासदार शैलीतून ते श्रोत्यांना आपल्या कथा कथनातून मंत्रमुग्ध करणारे व्यासंगी व्याख्याता आहेत. डॉ.यांची कथा-कविता त्यांच्या शेतीमातीच्या जिवंत अनुभवातून प्रवास करतांना वाचकांना अंतर्मुख करते. जवळपास दिड डझनपेक्षा जास्त पुस्तके डॉ.बडे सरांच्या नावावर असून आत्तापर्यंत त्यांना वाङ्मयातील अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे. लेखक या नात्याने डॉ.बडे हे एकाच साहित्य प्रकारात बंदिस्त नसून त्यांनी कथा-कविता लेखनाबरोबरच, कादंबरी, चरित्र ग्रंथ, मुलाखत ग्रंथ, बालसाहित्य इत्यादी साहित्य प्रकार हाताळले असून समीक्षण आणि संपादन क्षेत्रातसुद्धा त्यांचे नाव सन्मानाने घेतले जाते. त्यांच्या १९८८ साली प्रकाशित झालेल्या 'वावर' कविता संग्रहाने साहित्य क्षेत्रात खळबळ माजवली होती. शेतकरी व्यथे बरोबरच डॉ.बडेंची कविता

**बाई गं धीट हो घरासाठी उंबरठ्याबाहेर पाय**
**टाक**
**चालता चालता बळ येईल पायात**
**उगाच करंगळी धरायचे**
**दिवस आता संपलेत**



**बाई गं धीट हो**

इथल्या स्त्रीला धीट व्हायला शिकवते. या आणि अशा अनेक कवितांनी डॉ.बडेंनी समकालीन समाज मनाचा तळ ढवळून काढलेला आढळून येतो. येणाऱ्या पिढीला आधार देतांना डॉ.बडे सातत्याने आपले काव्य लोकाभिमुख करत असतात. कवितेच्या प्रांगणात त्यांची कविता फुलून येतांना त्यांची ग्रामीण कथा सुद्धा खेड्यापाड्यात रमतांना दिसते. त्यांचे 'पांढर' 'चिकाळा' 'खिलाऱ्या' 'आपल्या बापाच्या मातीत' आणि 'बाईचा दगड' हे कथासंग्रह आणि 'अंजीमाय' ही बाल कादंबरी मराठी कथा-कादंबरी विश्वात आपली वेगळी ओळख करून आजही वाचकांच्या पसंतीस उतरताना दिसते. शिरूर कासार सारख्या माळरानाच्या पट्ट्यात लोणी वारणी येथे जन्मलेल्या डॉ.बडेंना आपल्या घरातील, आणि भोवतालच्या ऊसतोड कामगारांच्या व्यथा-वेदना खोलवर ज्ञात आहेत. यातून त्यांच्या 'पाणकणस' या कादंबरीने जन्म घेतला. उपेक्षित, वंचित उसतोड कामगारांच्या व्यथा मांडतांना डॉ.बडेंनी आपल्या परिसराचे प्रतिनिधित्व करतांना आपल्या लेखणीतून आपल्या माय-मातीशी इमान राखले आहे. याचबरोबर बीड जिल्ह्यात जन्मलेले राष्ट्रसंत श्री संत भगवानबाबा यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या डॉ.बडेंनी संत भगवानबाबा यांचे पुरोगामी, शैक्षणिक कार्य विषद करणारे चरित्र लिहून आपल्या परिसराचा वसा समृद्ध केलेला आढळून येतो. त्यांच्या 'वावर' मध्ये संत भगवानबाबा यांच्यावर

**या डोंगर वनात बाबा तुम्ही होता**
**कष्ट, शांती जिद्द आणि शिक्षण**
**ही तर तुमची मुलतत्वे**

म्हणूनच, विनोबांसारखे तुमच्या भेटी आले या कवितेने बाबांच्या सर्वांगीण कार्याची महती त्यांच्या काव्य लेखनातून सुद्धा दृगोचर झाल्याशिवाय रहात नाही.

जन्मताच चिवट, कणखर आणि लढाऊ बाण्याचे असलेले डॉ. भास्कर बडे हे केंव्हाही परिस्थितीशी दोन हात करण्यास सज्ज असतात. यातूनच त्यांनी आपली वेगळी ओळख अबाधित ठेवतांना ते साहित्य विश्वातील निवडणुकीच्या माध्यमातून मराठवाडा साहित्य परिषदेवर दोन वेळा निवडून येवून कुणाचाही राजकीय वरदहस्त नसतांना ते मा.सा.प.च्या कोषाध्यक्ष पदापर्यंत जाऊन विराजमान होतांना त्यांचा मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यिकांना अभिमानच वाटत राहिला आहे. याशिवाय आत्तापर्यंत डॉ.बडेंनी अनेक कार्यक्रमातून कवितेचे आणि कथांचे सादरीकरण केले असून विविध संमेलनाची अध्यक्षस्थाने भूषविली आहेत. त्यांचा भारतभर लेखक-कवींच्या मित्रपरिवाराचा मळा फुललेला असून त्या द्वारे ते सातत्याने लोकांमध्ये बोलतांना, वावरतांना दिसतात. एवढे विपुल लेखन असलेले डॉ.बडे हे आत्तापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित झाले आहेत. त्यांच्या 'पाणकणस' कादंबरीला कै.भि.ग.रोहमारे आणि एकता साहित्य पुरस्कार, खिलाऱ्या कथा संग्रहास राज्यस्तरीय 'साहित्य साधना पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांच्या अनेक कथा महाराष्ट्रातील विविध विद्यापीठाच्या बी.ए. आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमात आहेत ही मोठी गौरवपूर्ण बाब म्हणावी लागेल. आज रोजी डॉ.भास्कर बडे सर आपला त्रेसष्टावा वाढदिवस मोठ्या सन्मानाने साजरा करतांना लेखन विश्वाला त्यांच्याकडून याहीपेक्षा सरस आणि धारदार लेखणाची अपेक्षा आहे. वय आणि अनुभवातून आलेली प्रगल्भता आणि त्यातूनच निर्माण होणाऱ्या नवीन कलाकृती मराठी सास्वतांना आणखी समृद्ध करतील यात तिळमात्र शंका नाही. वावर प्रकाशनाच्या माध्यमातून डॉ.बडे सरांनी नवोदित लेखकांना प्रकाशनाचे नवे दालन खुले करून नवीन ग्रंथ प्रकाशित होणे ही काळाची गरज आहे. नव्याने आलेले शेतीमातीचे अनुभव, शेतमजुर, शेतमालाचे भाव, खर्च आणि उत्पन्न यातील येणारी तफावत, त्यातून शेतकऱ्याची होणारी ससेहोलपट आणि परिणामी वाढत्या शेतकरी आत्महत्या यावर डॉ.बडे सरांच्या भविष्यात कथा-कादंबरी-कविता येतील आणि पुन्हा एकदा इथल्या बेधुंद, मस्तवाल सत्ताधारी मंडळींचे डोळे उघडतील हीच साहित्यिक अपेक्षा त्यांच्याकडून आहे. शिवाय या नंतरचे डॉ.बडे सरांचे दैनंदिन जीवन आनंदाने ओतप्रोत राहून त्यांना उदंड आयुरारोग्य लाभो हीच निसर्ग-ईश्वर चरणी विनम्र प्रार्थना करून हा लेखन प्रपंच तूर्तास इथेच थांबवतो! जय जवान! जय किसान!

# राहुल गांधी यांचे भारतविरोधी वक्तव्य चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राहुल गांधी नेहमीच चर्चेत असतात. विशेषतः केंद्रात मोदी सरकार सत्तारूढ झाल्यापासून त्यांनी मोदींवर तोंड सुख घातला कधीच मागेपुढे पाहिले नाही. पंतप्रधान मोंदिवर व भाजपर त्यांनी बेछूट वक्तव्य केलीत..विरोधी पक्षाने सरकारची चुका दाखविल्याचे पाहिजे..सरकारची धेयधोरणे चुकीचे असेल तर त्या विरोधात सरकारला उत्तर मागितलेच पाहिजे.मात्र परदेशात सरकार विरोधात बोलतात देशहित डोळ्यासमोर ठेवून बोलले पाहिजे. आपल्या देशाची प्रतिमा मलीन होणार नाही,असे देश हित विरोधी वक्तव्य टाळलेच पाहिजे.मात्र राहुल गांधी विदेशात भारतीयांशी संवाद साधताना सरकारवर व सरकारच्या धोरणात कडाडून टीका करतात. भारताची लोकशाही धोक्यात आल्याचे वक्तव्य करतात.काही दिवसांच्या आधी राहुल गांधी यूएस दौऱ्यावर होते त्यांनी भारतीयांशी पहिला संवाद साधला जो आधीच वादाचा केंद्रबिंदू बनला आहे.**

नवीन संसद भवनावर त्यांनी टिप्पणी केली. सरकारच्या धोरणाची खिल्ली उडविली. काँग्रेस नेत्याने पुन्हा एकदा परदेशी भूमीवर भारताचा अपमान केला.त्यांच्या भाषणा दरम्यान तर खलिस्तान समर्थक घोषणांवरील त्यांची प्रतिक्रिया देखील छाननीखाली आली आहे.

ब्रिटनच्या दौऱ्यावर असतांना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंब्रिज विश्वविद्यालयात भारतविरोधी वक्तव्यांची मालिकाच चालू केली. ते एवढ्यावरच न थांबता त्यांच्या प्रत्येक पत्रकार परिषदेत किंवा कार्यक्रमात भारत आणि भारतातील घटनात्मक संस्था यांच्या विरोधात आक्रमण करत राहिले. भारतातील न्यायसंस्थेचा अपमान करून त्यांनी न्यायसंस्थेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. या वेळी ते चीनचे गुणगान करत चीनविषयी प्रेम व्यक्त करतांना दिसून आले. यापूर्वीही त्यांनी चीनविषयी त्यांचे प्रेम दाखवले होते. भारत आणि चीन या देशांमध्ये गलवान येथे संघर्ष झाला होता, तेव्हाही त्यांनी भारतीय सैन्याविषयीच प्रश्न उपस्थित केले होते. त्यांनी भारत एक राष्ट्र नाही, तर राज्यांचा संघ आहे, असे म्हटले, तसेच राज्यांना वाटाघाटी करण्याचा अधिकार असण्याविषयीच्या गोष्टी केल्या. या गोष्टी भारतीय राज्यघटनेच्या रचनेच्या पूर्ण विरोधी आहेत. पत्रकार परिषदेत त्यांनी भारतातील लोकशाही मेलेली आहे, असे घोषित केले. आपले म्हणणे पुढे रेटून त्यांनी म्हटले, भारताला लोकशाही देण्यास अमेरिका किंवा युरोप यांनी पुढाकार घ्यावा. त्यांनी ब्रिटनमध्ये भारतीय संसदेचा अवमान करत भारतात अभिव्यक्तीस्वातंत्र्य संपले असल्याचे धादांत खोटे विधान केले. प्रसारमाध्यमांसह न्यायव्यवस्था, जनादेश आणि संसद या सर्वांचा त्यांनी अपमान केला. आयडियाज फॉर इंडिया' ही परिषद लंडनमध्ये झाली. या परिषदेत राहुल गांधी यांनी भाजप सरकारवर हल्लाबोल केला. राहुल म्हणाले की, 'आत्म्याला आवाजाशिवाय अर्थ नाही, भारताचा आवाज दाबला गेला आहे. काँग्रेस आता भारतासाठी लढत आहे. ही वैचारिक लढाई



आहे. पाकिस्तानप्रमाणेच ईडी, सीबीआयसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर करून राज्ये आणि संस्था पोकळ केल्या जात आहेत.राहुल पुढे म्हणाले की, सध्या भारतातील परिस्थिती चांगली नाही, भाजपने देशभर रॉकेल शिंपडले आहे. एक ठिणगी पडली आणि आम्ही सर्वजण एका मोठ्या गोंधळात सापडणार आहोत. जनतेला एकत्र आणून लोकांमध्ये पेटलेला संताप आणि आग शांत करण्याची जबाबदारी ही काँग्रेसची आहे.' यावेळी राहुल यांनी भारताची तुलना पाकिस्तानशी केली. रशिया युक्रेनमध्ये जे काही करत आहे, तोच प्रकार चीन भारतातील डोकलाम आणि लडाखमध्ये करत आहे. चीनने भारतातील डोकलाम आणि लडाखमध्ये आपले सैन्य तैनात केले आहे आणि अरुणाचल प्रदेश आणि लडाखला भारताचा भाग मानण्यास नकार दिला आहे. राहुल गांधी यांची ही वक्तव्य निश्चितच त्रासदायक आहेत.लंडनमध्ये समोर बसलेल्या एका शीख गृहस्थाकडे बोट दाखवत ते म्हणाले की, ते भारतातील शीख असोत, मुस्लिम असोत की ख्रिश्चन असोत, ते द्वितीय श्रेणीचे नागरिक बनले आहेत. कारण मोदी सरकार या सर्वांना द्वितीय श्रेणीचे नागरिक मानते. राहुल गांधींचे हे विधान अत्यंत अस्वस्थ करणारे आहे. अशा विधानांचा फायदा खलिस्तानी, इस्लामी आणि इतरही घेतील. घटकही उठवतील, यावर राहुल यांनी फेरविचार करावा. दुसरे म्हणजे भारताच्या लोकशाहीतील दोषांवर त्यांनी अनेक गोष्टी बोलल्या. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे. पण भारतातील लोकशाही नुसतीच चिरडली जात नाही तर संपली आहे, असे ते म्हणाले. म्हणजे भारतात लोकशाही नाही. लोकशाहीचे रक्षक म्हणवणारे अमेरिका आणि युरोप बेफिकीर असल्याचेही ते म्हणाले. भारतात लोकशाही पुनर्संचयित करण्यासाठी या हस्तक्षेपांना बोलावले पाहिजे असे त्यांनी म्हटले नाही. पण याचा अर्थ भारतात लोकशाही संपत आहे आणि युरोपीय देशांनी हस्तक्षेप करावा असे त्यांना वाटते. भाजपने याबाबत मुद्दा बनवला असून राहुल गांधींना घेरले आहे. म्हणूनच राहुलच्या बोलण्यात या दोन गोष्टी सगळ्यात जास्त त्रासदायक आहेत.

राहुल गांधी ज्या देशातील न्यायव्यवस्थेवर टीका करत आहेत, त्याच देशाच्या न्यायव्यवस्थेने त्यांना नॅशनल हेराल्डच्या आर्थिक घोटाळा प्रकरणातील खटल्यामध्ये जामिनावर सोडले आहे. भारताच्या ज्या संसदेचा ते विदेशात अवमान करत आहेत, त्याच संसदेत ते कित्येक घंटे सूत्रांविना नाटके केलीत , कधी डोळा मारणे, तर कधी सभापतींच्या दालनामध्ये जाऊन विदूषकाप्रमाणे वर्तन करणे.है विरोधी पक्षनेत्याला शोभणारे आहे का ?

देशाने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला निवडणुकीत प्रचंड जनमत देऊन सत्तेवर बसवले आहे, याचे राहुल गांधी यांना विस्मरण झाले आहे. या देशातील तेच लोक आहेत, ज्यांनी राहुल गांधी यांना अमेठीमध्ये पराभवाचा आणि केरळमधील वायनाडमध्ये विजयाचा अनुभव दिला. भारताच्या लोकशाहीला मृत ठरवतांना त्यांच्या आत्म्याला काहीच वाटले नाही. ते ज्या लोकशाहीला मृत घोषित करत आहेत, त्या देशाने त्यांना एवढी मोठी ओळख दिली की, राहुल गांधी विदेशात भारताच्या सार्वभौमत्वावर आक्रमण करतांना हसत आहेत. राहुल गांधी यांची आजी इंदिरा गांधी यांनी वर्ष १९७५ मध्ये लोकशाहीची हत्या करून देशाला आणीबाणीच्या साखळदंडामध्ये बांधले होते, याची राहुल गांधी यांना आठवण नाही का ? याच आणीबाणीतील अमानुष अत्याचारांमुळे लोकशाहीची हत्या झाली होती, याची त्यांना कुणी आठवण करून देईल का ? संसदेत चर्चा करण्याऐवजी डोळा मारणारे राहुल गांधी त्यांच्या टूलकिट ( एखादी विचारसरणी पुढे रेटण्यासाठी राबवण्यात आलेली योजना ) टोळीच्या इशाऱ्यावर वागत असतात.

निवडणुकीची सभा असल्याप्रमाणे राहुल गांधी विदेशी भूमीवर भारताच्या विरोधात विधाने करून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा अपमान करत आहे. भारताचा विरोध करणे, हा राहुल गांधी यांचा हेतू आहे का ? राहुल गांधी आंतरराष्ट्रीय टोळीच्या सूचनांवर नाचत आहेत आणि सुनियोजितपणे भारताच्या विरोधात विधाने करून देशाची जनता, राज्यघटना, भारतीय लोकशाही आणि जनादेश यांचा विदेशामध्ये जावून अपमान करत आहेत.जी अतिशय चिंताजनक आहे.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# आंबेडकरवादी नेत्यांनी स्वप्नातून बाहेर यावे

आधुनिक केसरी

**आंबेडकरवादी चळवळीला सर्वात जास्त धोका हा वैचारिक शत्रूपासून नाही तर स्वतः ला आंबेडकरवादी म्हणून घेणाऱ्या व स्वतः ची दुकानदारी चालवणाऱ्या नेत्यां पासुन आहे. हे फक्त नावाला आंबेडकरवादी आहेत परंतु एकही गुण आंबेडकरांचा घेत नाहीत. आपल्या कृती मध्ये, विचारामध्ये आंबेडकरवाद नसतो. आंबेडकरवादाची झुल चढवून मनुवाद्यांचे काम करणाऱ्या लोकांनीच आंबेडकरवादी चळवळ कमकुवत करण्याचा प्रयत्न केला हे विसरून चालणार नाही. हल्ली आंबेडकरवादी म्हणवून घ्यायचे आणि स्वतः चे पक्ष संघटना निर्माण करायचे हा ट्रेंडच झाला आहे. आंबेडकरवादी चळवळीला मारक तिन प्रकारचे लोक आहेत. एक म्हणजे स्वतःला आंबेडकरवादी समजणारे राजकीय नेते. यामध्ये ही दोन प्रकार पडतात एक प्रस्थापित व दुसरा नवोदित. प्रस्थापित नेत्यांच्या अवतीभवती काही भक्तांचा गोतावळा असतो. राजकीय नेता म्हणेल तसेच अनुकरण भक्त लोक करतात आणि स्वतः च्याच नेत्याला सर्वश्रेष्ठ व सर्व बुद्धीमान समजतात.**

भक्तांना आपलाच नेता पावरफुल दिसतो. आपलाच नेता विचाराचा दिसतो. दुसरा जो आहे तो नवोदित राजकीय नेता. ह्या गटातील नेत्यांकडे भक्तांची संख्या कमी असल्याने सोशल मिडिया व इतर माध्यमातून स्वतःला च मीच कसा आंबेडकरवादी चळवळ चालवतो, मीच कसा खणकर बोलतो, माझ्याच कृती ची दखल शासन प्रशासन घेते अशा प्रकारची जाहिरात करून स्वतः चे अस्तित्व निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जातो. दुसरा प्रकार आहे तो म्हणजे सामाजिक नेते. सामाजिक नेते तर खुप घातक आहेत. स्वतःला बुद्धीमान समजून, मीच सामाजिक काम कसे योग्य करतो, मी काम करतो म्हणजे कोणातरी उपकार करतो, माझ्या सारखा सामाजिक नेताच समाजामध्ये नाही अशा अविर्भावात तो राहत असतो. तिसऱ्या प्रकारचे लोक आहेत ते म्हणजे विद्वान, अभ्यासक व कलाकार. हल्ली हे लोकही चवळवळ माझ्या च खांद्यावर आहे. मी आहे म्हणून चळवळ आहे, माझ्या सारखा बोलणारा, गाणारा, अभ्यासु दुसरा कोणीच नाही याच मस्तीमध्ये असतात. म्हणजेच एक आंबेडकरवादी चळवळ राजकीय, सामाजिक व साहित्यिक अशा तिन ठिकाणी विभागली गेली. फक्त विभागली गेलीच नाही तर राजकीय आणि सामाजिक हजारो तुकडे झाले. प्रस्थापित राजकीय नेते व्यवस्थेशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष तडजोड करून स्वतः ची पोळी भाजुन घेतात. नवोदित राजकीय नेते स्वतः चे दुकान चालण्यासाठी स्थानिक पातळीवर तडजोड करून पोट भरतात, विद्वान प्रकारातील लोक मिळेल तिथून जेवढे मिळेल ते मिळवण्याचा प्रयत्न करतात. परंतु यांच्या बोलण्याकडे जर बघितले तर नवीन व्यक्तीला खरचं वाटेल हा व्यक्ती आंबेडकरवादी चळवळ चालवतो. परंतु स्वतः चे पोट भरावे म्हणून स्वतः च स्वतः ला मोठे म्हणवून घेणारे हे चळवळीचे असुच शकत न नाही. खरा आंबेडकरवादी नावासाठी, पोटासाठी, प्रसिद्धी साठी नाही तर सामाजिक हितासाठी काम कार्यकर्ता म्हणून काम करत असतो. तो कधीच चांगल्या गोष्टीचे श्रेय स्वतः कडे घेत नाही. परंतु बेगडी आणि स्वतःसाठी काम करणारे आंबेडकरवादी हे मान पान सन्मान यामध्ये फसलेले आहेत. यांना कोणतेही काम न करता केवळ नाव पद पैसा पाहिजे. हजारो नेते तयार झाले स्वतः ला आंबेडकरवादी समजतात परंतु एक होत नाहीत याचे कारणच आहे एक झाले तर त्यांना आपले नाव, पद व प्रतिष्ठा जाईल, एक झालो तर वैयक्तिक स्वार्थासाठी तडजोड करता येणार नाही हि भीती असते म्हणून एकत्र येण्याच्या विचारात ते पडत नाहीत. एकत्र नाहीत आपापली दुकाने थाटून बसली म्हणजे यांच्या कडे नाव,पद,प्रसिद्धी आहे असे मुळीच नाही. परंतू जे आपल्या कडे नाही ते टिकवण्याचा केवीलवाणा प्रयत्न म्हणजे स्वतः ची दुकानदारी होय. एकाही राजकीय सामाजिक नेत्यामध्ये शासन प्रशासनावर दबाव येईल एवढी ताकद नाही. हजारो म्हणून डोंबारा पिटून कार्यक्रमात अडथळा निर्माण करणारे अनेक लोक आहेत. काम चांगले आहे की वाईट आहे याचे काही घेणे देणे नसलेले परंतु नावासाठी व हारतुरे मिळावे म्हणून तयार होऊन बसणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. चळवळीचे वैचारिक काम करणारे लोक समाजामध्ये नाहीतच आणि न मिळालेला न्याय हे हजारो राष्ट्रीय नेत्यांच्या गालावर मारलेली त्यांचे अस्तीत्व नाकारलेली चपराक आहे. परंतु त्या गोष्टी चे काही घेणे देणे नाही. कारण आंबेडकरवादी चळवळीचा खरा कार्यकर्ता वा नेता हा स्वतः च्या पोटासाठी, पदासाठी नाही, स्वतः च्या मानासन्मानासाठी नाही तर इतरांसाठी लढत



नेते असुनही आंबेडकरवादी जनतेवर अन्याय अत्याचार होतोच, आणि न्यायही मिळत नाही. मग हे नेतृत्व काय कामाचे ? जे न्याय मिळवून देऊ शकत नाहीत, जे हजारोच्या संख्येने असुनही अत्याचार कमी करु शकत नाही, अत्याचार कमी करणे सोडा पण अत्याचार झाल्यावर लवकर तक्रार दाखल होत नसेल आणि तरीही हजारोंच्या संख्येने लोक आम्ही आंबेडकरवादी राष्ट्रीय नेते आहोत असे बोलत असतील तर आपल्या नेतृत्वाला, आपल्या वक्तव्याला काहीच किंमत नाही हि बाब लक्षात का येत नसेल. काही काही लोक तर नाव पद प्रसिद्धी साठी अमाप पैसा खर्च करायला तयार आहेत. स्वतः च्या नावा साठी, खोट्या ऊदोउदो साठी लाखों रुपये खर्च करणारे लोक येथे आहेत. परंतु एखाद्या ठिकाणी नाव टाकले नसेल तर तो कार्यक्रम च चुकिचा आहे असे मुळीच नाही. अनेक लोक आहेत जे स्वतः जवळचा पैसा, वेळ व बुद्धी खर्च करून समाजहिताचे काम करतात. परंतु नावासाठी हपापलेले लोक एकतर अशा लोकांना समोर येऊ देत नाहीत. किंवा त्यांच्या वर दोषारोप करून खच्चीकरण केले जाते. म्हणून मुळ वैचारिक आंबेडकरवादी चळवळ बाजूला राहते व चळवळीच्या नावाखाली पोट भरणारे, नाव व बेगडी मानसन्मान मिळवणारे नेहमी चर्चेत राहतात म्हणून चुकिच्याच लोकांचा भरणा जास्त दिसतो. प्रस्थापितासह सर्व राष्ट्रीय नेते स्वतः चा एक आमदार, एक खासदार सोडा स्वतः निवडून नाही येऊ शकत. याचे चिंतन मंथन कधीच होत नाही. उलट प्रत्येक जन स्वतः च्या आभासी जिवनात जगुन स्वतः ला मोठे समजण्याचा प्रयत्न करते. वाढते अन्याय अत्याचार, त्यांची वेळेवर न घेतलेली दखल असतो. येथे सर्व उलट आहे म्हणजे सद्या स्वतः ला आंबेडकरवादी समजणारे लोक हे आंबेडकरवादी नाहीत. दुसरी महत्वाची गोष्ट ती म्हणजे संघटीत व्हायची बुद्धाला संघाची, व बाबासाहेब आंबेडकर यांना संघटनेची गरज पडली आणि जो कोणी हे सगळं मी एकटाच करू शकतो मला कोणाची गरज नाही असे म्हणतो तो आंबेडकरवादी नाही. कारण स्वतः बाबासाहेब आंबेडकर संघटीत होऊन संघर्ष करण्याचा सल्ला देतात. हजारो राष्ट्रीय नेते असुन केवळ अन्याय अत्याचार झाल्यावर निषेध करणे, पिडीत कुटूबाला भेट देणे एवढेच काम केलेले दिसते. हल्ली मागिल काही दिवसांचा विचार केला तरी अनेक अत्याचारातील आरोंपीना शिक्षाच झाली नाही. या गंभीर बाबीवर कोणी एकत्र येऊन चर्चा करत नाही. हजारो नेते असुन न्याय मिळत नसेल तर त्या नेतृत्वाचे लोनचे घालायचे का ? आजही अनेक गरीब होतकरू पण गुणी विद्यार्थी समाजामध्ये आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी काय अडचण येते, कलागुणांना कसा वाव देता येईल, आर्थिक अडचण कशी सोडवता येईल या संदर्भात मात्र कोणीच दारी येत नाही तरीही त्यांना नेते म्हणणे बुद्धीला पटणारे नाही. घरातील व्यक्तीच्या मृत्यूनंतर नातेवाईक काही मदत करून जातात पण नेते मात्र दुर्लक्ष करतात. ते समाजाचे नेते कसे असु शकतात. राजकीय नेते काम धंदा काहीच करत नाहीत परंतु चारचाकीने फिरतात कार्यकर्ते बेरोजगार असतात. मग नेते व नेत्यांची मुलं पैसा कसा कमवतात हे मात्र कोणालाही सांगितले जात नाही. हे आंबेडकरवादी चळवळीचे लक्षण मुळीच नाही. स्वतः च्या मानापानासाठी, खुर्ची साठी लढणारे सर्वसामान्य मानसाला मानसन्मान कसा मिळवून देतील ? बरं हे वैयक्तिक पणे एवढ्यावरच थांबत नाहीत तर एकमेकांचे पाय ओढून खाली उतरण्याचा प्रयत्न करतात. हजारो नेते असून दबाव व ताकद निर्माण करू शकत नाहीत तर ती चळवळ नाही वळवळ आहे. झोपेमध्ये एखादे सुखद स्वप्न बघितल्यासारखे स्वयघोषीत आंबेडकरवादी लोक जिवन जगत आहेत. माझे नाव व माझ्या वक्तव्याची दखल घेतली जाते, बाहेर माझे वजन आहे, मीच आदर्श व विद्धान नेता आहे, चळवळीची जबाबदारी माझ्यावरच आहे, अत्याचाराला मीच न्याय देऊ शकतो अशा प्रकारचे स्वप्न हे लोक बघत आहे. वास्तविक अन्याय अत्याचार वाढून न्यायही मिळत नाही मग ते नेतृत्व, ती विद्वता कुचकामी नाही तर कशी आहे ? आणि मुळात हे लोक आंबेडकरवादी आणि विद्वान नाहीत कारण ज्यांना एक होता येत, विद्वतेचा फायदा समजाला करून देता येत नाही, आणि अत्याचाराला न्याय देता येत नाही त्यांना आंबेडकरवादी व विद्धान कसे म्हणायचे ? म्हणुन अजूनही वेळ गेली नाही स्वप्नातुन जागे होऊन सत्य परिस्थिती बघुन एकत्र व्हा आणि दुकानदारी बंद करून एकत्रित नाही होता येत तर किमान सामाजिक व निस्वार्थ काम करणाऱ्यांच्या मध्ये अडथळा निर्माण करू नका. आणि सर्वात महत्त्वाचे कोणाचे चांगले काम, विचार याची दखल घेऊन त्यावर चर्चा करा, प्रोत्साहन द्या म्हणजे आपली एकी दिसेल व ताकद निर्माण होईल. जो चांगल्या कामाची वाहवा करत नसेल, चांगल्या कामाला स्वहीत नसेल तर प्रोत्साहन देत नसेल तर त्याची बुद्धी, नेतृत्व आणि पैसा मातीमोल आहे. म्हणून स्वतः ला आंबेडकरवादी समजणाऱ्या नेत्यांनी स्वप्नातुन बाहेर येणे आवश्यक आहे.



दत्ताराम दळवी
मो.नं ९८२०५२७८५५

# आताची पिढी मागच्या पिढीला विसरते आहे

आधुनिक केसरी

**निसर्गाने अनेक कृती आणि प्रकृत्ती या सृष्टीवर निर्माण केलेल्या आहेत, त्यामुळे सर्व संस्कृती मानवाने आजपर्यंत जपलेल्या आहेत. त्यामुळे कित्येक वर्ष उलटली तरी आपण आपल्या संस्कृती म्हणूनच पिढ्यांपिढ्या आपण आपापल्या धर्माप्रमाणे सर्व सण एकजुटीने साजरे करीत आहोत. मात्र अलिकडच्या काळात समाजात फार मोठे बदल होत आहेत. कारण आताची पिढी फक्त भ्रमात जीवन जगते आहे. हा माझा, तो माझा मला विचारणारे माझे, पाहीले तर तुमची वेळ चांगली असेल तर सर्व तुमचे, नाहीतर सर्व जवळ असूनसुध्दा दूरचे आणि लांबचे असतात हेच जीवनाचे सत्य.**

सकाळी लवकर उठणारे, रात्री वेळेवर झोपणारे, पाणी वाया न घालवता झाडाला घालणारे, देवांसाठी फुले तोडणारे, रोज पूजा करणारे, मंदिरात एखादी फेरी मारणारे, रस्त्यातून भेटणाऱ्यांची आस्थेने चौकशी करणारे, दोन्ही हात जोडून नमस्कार करणारे, अन्नधान्य वाया जाऊ नये म्हणून बेतानेच मर्यादीत स्वयंपाक करणारे, त्यातून काही उरवून गोर गरिबांना देणारे, नाही तर उरलेसुरले सकाळी स्वतःच खाणारे, घरात गैरसोय असूनही पाहूणचार करणारे, व्यसन करताना लाजणारे आणि समाजाच्या नजरेची चीड बाळगणारे, जुना झालेला चष्मा तुटला तर चिटकवून वापरणारे, जुनी चप्पल फाटली तर शिवून आणि जुन्या बनियानला भोक पडेपर्यंत वापरणारे, उन्हाळ्यात पापड - कुरडे वाळवणारे, हात दुखेपर्यंत घरगुती मसाला कुटणारे, फक्त बाहेर घालणाऱ्या कापड्यांनाच इस्त्री करणारे, खिशातला पैसा जपून वापरणारे, शक्यतो घरीच जेवणारे, असे लोक आता हळू हळू हे जग सोडून चालले आहेत. आणि फक्त आजचा विचार करणारे लोक समाजात वावरु लागले आहेत. हे जग सोडणाऱ्यांबरोबर वरील अनेक चांगली शिकवण ही जाईल. समाधानी, चांगले, साधे, अर्थपूर्ण, दुसऱ्यांना प्रेरणा देणारे आणि समोरच्यांची काळजी करत जीवन जगायचे असते ही शिकवण सुध्दा या जगातून कायमची नाहीशी होईल, नेतृत्व, कर्तृत्व व स्वाभिमान सुध्दा त्यांच्याच बरोबर संपेल की काय अशी भिती वाटते. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपापल्या समाजाची संस्कृती जपणे हिताचे आहे. आधुनिकिकरणाच्या या युगात पूर्वपार चालत आलेल्या प्रथा, रीती रिवाज या विसरुन चालणार नाहीत. उलटपक्षी त्यांचे पालन करु, आदराने सर्व समाजातील जनतेने आपापल्या संस्कृतीचे जतन करणे आवश्यक आहे. आताच्या इंटरनेटच्या संगणकिय जगात वावरताना बऱ्याच जुन्या परंपरांना विसरावेच लागेल. ज्याला दुःखाची जाणीव असते त्याला सुखाची किंमत कळलेली असते, म्हणून जे कष्टमय दिवस आपण काढले आहेत त्याची जाणीव ठेवा. सुंदर चेहरा म्हातारा होतो, बलाढ्य शरीर सुध्दा एक दिवस गळून पडते, मोठे पद सुध्दा एक दिवस निघून जाते, परंतु हे सर्व उपभोगणारा आणि सत्कार्य करणारा माणूस फक्त स्मरणात राहातो.

आनंद नेहमी चंदनासारखा असतो, दुसऱ्याच्या कपाळावर टिळा लावला तरी आपली बोटे सुगंधीत करून जातो. शुन्यातून प्रवास करत माणसांनी प्रेरणादायी विश्व निर्माण केलेले आहे. याचा विसर कधीच पडू देऊ नका. माणुस कितीही मोठा असला, मोठ्या बंगल्यात राहीला, मोठ्या गाडीतून फिरला, उंची कपडे घातले तरी त्याची




किंमत शुन्य असते. कारण त्याच्या वागण्यावरुन आणि सत्कार्यावरुन त्याची किंमत ठरवली जाते. पक्षी जेव्हा जीवंत असतो तेव्हा तो किड्या मुंग्याना खातो पण जेव्हा तो मरतो तेव्हा त्यालाच किडे मुंग्या खातात. हाच निसर्गाचा नियम आहे. तुम्ही खुप शक्तीशाली असाल पण वेळ तुमच्यापेक्षा शक्तीशाली आहे. आपली वेळ आणि परिस्थिती केव्हाही बदलू शकते. म्हणून कोणाचाही अपमान करू नका किंवा कुणालाही कमी लेखू नका, हे सर्व जुन्या पिढीने जपले आहे ते असेच नव्या पिढीने जपावे. परिस्थिती प्रमाणे बदलणे ही काळाची गरज असली तरी आपण आपले संस्कार, रितीरीवाज, परंपरा आणि स्वाभिमान कधी ही सोडू नयेत. हे सर्व पाहीले की वाटते. नव्या पिढीपुढे अनेक भयंकर आव्हाने आहेत. जस जसा काळ बदलेल तसे नवोदितांने ते अंगीकारणे प्रार्थनिय आहे. मागिल पिढीचे अनुकरण करावेच असे नाही परंतु त्यांना विसरु नये असे वाटते.

सध्या हे कलीयुग चालू आहे. आता पापपुण्याचा हिशोब जीवंतपणीच होतो. आपण जीवंत असे पर्यंत सर्व हिशोब चुकता करावा लागतो. त्यासाठी आई वडिल जे मार्गदर्शन करतात त्यांचे पालन तरुणाई करायला हवे. कारण वाड- वडिलांनी काबाड कष्ठ करुन सर्व संसार सांभाळलेला असतो तो त्यांची आठवण म्हणून जतन करून ठेवला पाहीजे. गडगंज संपत्ती असली तरी ती सर्वाना ईथेच ठेऊन जायची आहे. आपण असे पर्यत त्याचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. कारण चांगल्या लोकांचा मान कधी कमी होत नाही. सोन्याचे शंभर तुकडे केले तरीही त्याची किंमत होत नाही, चुकणं ही प्रकृती आहे, तर मान्य करणं ही संस्कृती आहे आणि आपल्या आचरणात सुधारणा करणे ही प्रगती आहे. जगायचे तर दिव्या सारखे जो राजाच्या महालात आणि गरिबांच्या झोपडीत सारखाच प्रकाश देतो. म्हणून नवीन पिढीने जुन्या जाणत्यांचे बुजुर्गांचे अनुकरण करणे गरजेचे वाटते. त्यासाठी नव्या पिढीने मागील पिढीला विसरु नये असे वाटते.

# वसंत मुंडे यांची भूमिका वृत्तपत्र क्षेत्रासाठी दिशादर्शक :आ.श्रीकांत भारतीय

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून केलेले लिखान, सामाजिक भान दाखवणारे आहे.
तर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष म्हणून वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर आणि पत्रकारांच्या समस्यांवर घेतलेली भूमिका वृत्तपत्र क्षेत्राला दिशा देणारी असल्याने ही भूमिका सरकारने समजून घेतली पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेला पुरस्कार हा मुंडेंच्या प्रयत्नांचा सन्मान आहे. अशा शब्दात भाजपचे प्रदेश महामंत्री विधान परिषदेचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी कौतुक केले.
बीड येथे रविवार दि. 18 जून रोजी भाजप प्रदेश महामंत्री विधीमंडळ सदस्य आमदार श्रीकांत भारतीय यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली. लोकमत मिडीया ग्रुपचा यावर्षीचा आंतराष्ट्रीयस्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवॉर्ड मिळाल्याबद्दल वसंत मुंडे यांचा सत्कार करुन भारतीय यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी संपादक संतोष मानूरकर, पत्रकार संघाचे बाबा देशमाने, वैभव स्वामी, गंगाधर काळकुटे आदि उपस्थित होते. यावेळी बोलताना भारतीय यांनी वसंत मुंडे यांच्या वीस वर्षाच्या पत्रकारीतेतील कामाचे कौतुक करुन पत्रकार संघटनेच्या माध्यमातून वृत्तपत्र क्षेत्राला दिशा देणारी भूमिका घेतल्याबद्दल कौतुक केले. सामान्यांचे प्रश्न मांडताना प्रसारमाध्यमात



काम करणाऱ्यांचेही प्रश्न मांडून ते सोडवण्यासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचा आंतराराष्ट्रीय पुरस्काराने सन्मान झाला. ही बाब मराठवाड्यासाठी गौरवाची आहे.
वृत्तपत्रांचे अर्थकारण सरकारने समजून घ्यावे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मागच्या तीन वर्षात वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर राज्यभरात विभागीय सात अधिवेशने, संपादकांची गोलमेज परिषद घेऊन वृत्तपत्रांचे अर्थकारण मांडले आहे. सखोल अभ्यास करुन वृत्तपत्रांचे सध्याचे वास्तव आणि यावर भविष्यातील पर्याय दाखवण्याचा प्रयत्न मुंडे यांनी केला आहे. हे अर्थकारण सरकारने समजून घेणे गरजेचे आहे असे मत आमदार श्रीकांत भारतीय यांनी व्यक्त केले.

# समान नागरी कायद्याबद्दल उद्धव ठाकरे यांच्या तोंडी मुस्लिम लीगची भाषा

## भाजपा प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी समान नागरी कायद्यामुळे हिंदूंना त्रास होणार असल्याचे सांगितले असून त्यांचे हे वक्तव्य घटनासमितीत समान नागरी कायद्याच्या मार्गदर्शक तत्त्वाला विरोध करणाऱ्या मुस्लिम लीगच्या नेत्याप्रमाणेच आहे. देशहिताच्या महत्त्वाच्या विषयावर मुस्लिम लीगची भाषा बोलणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आता तरी आपण हिंदुत्व सोडले नाही असे सांगू नये, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी सोमवारी मुंबईत पत्रकारांशी बोलताना केले. विश्वास पाठक म्हणाले की, शिल्लक सेनेच्या शिबिरात भाषण करताना उद्धव ठाकरे यांनी समान नागरी कायद्यामुळे हिंदूंना किती त्रास होणार आहे ते सांगा, असे आवाहन केले. सरकारने समान नागरी कायदा करावा असे मार्गदर्शक तत्त्व देशाच्या संविधानात समाविष्ट केले गेले. त्यावेळी घटनासमितीच्या बैठकीत अनेक मुस्लिम सदस्यांनी त्याला जोरदार विरोध केला होता. त्यापैकी एकजण असलेले मुस्लिम लीगचे मद्रासचे सदस्य बी. पोकर साहेब यांनी या तरतुदीला विरोध करताना हिंदू धर्मियांचा मुद्दा मांडला होता. समान नागरी कायद्यामुळे होणारा हस्तक्षेप जुलमी आहे अशी हिंदूंची निवेदने आपल्याकडे आली तसेच हिंदू समाजातील अनेक घटक याच्या विरोधात बंड करत आहेत, असे त्या मुस्लिम सदस्याने सांगितले होते. उद्धव ठाकरे यांनीही समान नागरी कायद्यामुळे हिंदूंना त्रास होईल हा लावलेला शोध मुस्लिम लीगच्या भूमिकेसारखाच आहे. विश्वास पाठक म्हणाले की, समान नागरी कायद्याबाबात मुस्लिम लीगप्रमाणे भूमिका मांडणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी याबाबत घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही भूमिका समजून घ्यायला हवी. समान नागरी कायद्याबाबतची तरतूद प्रभावहीन करण्यासाठी घटनासमितीत सुधारणा मांडण्यात आल्या होत्या. त्यावर दि. २३ नोव्हेंबर १९४८ रोजी चर्चा झाली होती. या चर्चेत भाग घेताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुस्लिम सदस्यांनी मांडलेले आक्षेप मुद्देसूदपणे खोडून काढले होते आणि समान नागरी कायद्याच्या तरतुदीचे समर्थन केले होते. घटना समितीच्या कामकाजाच्या नोंदीत याचा उल्लेख आहे व तो सर्वांना पाहण्यास उपलब्ध आहे. ते म्हणाले की, मुंबई महापालिका निवडणुकीत वीस टक्के मतांच्या गठ्ठ्यासाठी समान नागरी कायद्याबद्दल अपप्रचार करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी थेट मुस्लिम लीगच्या पावलावर पाऊल ठेवले आहे. त्यामुळे आता तरी आपण हिंदुत्व सोडले नाही असे सांगणे त्यांनी बंद केले पाहिजे.



# आठवडी बाजारात शेतकऱ्यांची बैलजोडी घेण्यासाठी लगबग

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :**सोमवारच्या आठवडी बाजारात बैलजोडी घेण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी दिसून येत आहे शेतकऱ्याला पावसाची प्रतिशा लागली आहे. शेतीच्या पेरणीच्या कामासाठी शेतकरी बैल जोडी घेताना दिसत आहे शेतीच्या कामासाठी खरेदीचे प्रमाण वाढले असते बैल जोडीदार लाखापर्यंत पोहोचले आहे शेतकऱ्याकडे बैल जोडीचे प्रमाण घटले असून ट्रॅक्टर द्वारे शेतीच्या मशागतीची कामे धोरण सुरू करण्यात आले असून शेतकऱ्याला पेरणीची आशा लागली असून पेरणीसाठी असल्याने काही शेतकरी पेरणीच्या हंगामा पर्यंत बैलजोडी घेतात व नंतर विकून टाकतात त्यामुळे पेरणीच्या काळात बैलजोडीचे दर चांगले वाढलेले दिसतात वडद बाजारचा सोमवारचा आठवडी बाजार हा जनावरांच्या बाजारासाठी मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध असून या बाजारात विविध जातीचे बैल जोड मोठ्या प्रमाणात व्यापारी बैल जोडी इतर जनावरे विक्री खरेदीसाठी येतात तर शेतकऱ्यांना चांगल्या बैलजोडीचे खरेदी करण्यासाठी समोरच्या आठवणी बाजारात गर्दी दिसत होती एक बैल जोडीसाठी लाखभर रुपयापर्यंत खरेदी करण्यात आली. शेतीच्या मशागतीचे कामे संपली असून शेतकऱ्याला पावसाची आशा लागली आहे. पाऊस लांबल्याने मृग नक्षत्र कोरडे जाते की काय याची चिंता शेतकऱ्याला लागली आहे.




# चिमुकल्यांना बैलगाडीत बसवून पहिल्या दिवशी केले स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी - पळसखेडा येथे दिनांक 15 जून 2023 रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा टीटवी, केंद्र सावळदबारा तालुका सोयगाव जिल्हा औरंगाबाद, येथे शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता१ली मधील दाखल पात्र विद्यार्थ्यांना शाळेच्या पाहिल्या च दिवशी१००%प्रवेश देण्यात आले! व प्रवेशोत्सव उत्साह साजरा करण्यात आला प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच संध्याताई भागवत जाधव हे होते.तर अध्यक्षस्थानी युवराज राठोड हे होते.सकाळी इयत्ता पहिलीच्या मुलांची सर्जा राज्याने सजवलेल्या बैल गाडीवरून टिटवी गावातून मिरवणूक काढण्यात आली.गावात ठिकठिकाणी मान्यवरांच्या हस्ते चिमुकल्यांचे स्वागत करण्यात आले.विविध स्टॉलची ओळख करून देण्यात आली प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी विविध कृती करुन दाखवल्या.अशा प्रकारचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, गावच्या सरपंच, श्रीमती संध्याताई, भागवत जाधव, उप सरपंच लहू राठौड़, ग्रा पं सदस्य दिलीप जाधव, कय्यूम तड़वी यांचे हस्ते, सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले! सर्वप्रथम इयत्ता पाहिलीत नव्यानेच प्रवेशित झालेल्या मुलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आणि त्यांना बैल गाडीत बसवून गावातून प्रवेश दिंडी काढण्यात आली. आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्याच शाळेत दाखल करा असे मा मुख्याध्यापक अरुण गवळी सर व सर्व शिक्षकांच्या वतीने आवाहन करण्यात आले. पहिलीच्या सर्व पात्र मुलांचा१००% प्रवेश निश्चित करण्यात आला, प्रवेश दिंडी सोहळ्यात ग्रा.पं. सदस्य, ग्रा.शि.समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा स्वयसेविका, शिक्षण प्रेमी, समस्त नागरिक यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला नंतर शाळेत बदली होऊन आलेले शिक्षक बंधु श्रीमान मेमाणे सर, श्री मोरे सर, श्री ज्ञानेश्वर मख सर यांचे शाल व श्रीफळ देऊन, सरपंचपती भागवत जाधव यांच्या हस्ते सत्कार व सहर्ष स्वागत करण्यात आले. या निमित्ताने या शैक्षणिक वर्षात गुणवत्तापुर्ण शिक्षणाची हमी शिक्षकांच्या वतीने देण्यात आली. तदनंतर मुलांना चॉकलेट बिस्किटांचे वाटप करण्यात आले व सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकं देण्यात आले.व गोड़ भात विद्यार्थ्यांना वाटन्यात आला! याप्रसंगी सरपंच संध्याताई भागवत जाधव, उपसरपंच लहू राठोड, युवराज राठोड, विष्णू राठोड, संदीप जाधव, दिलीप जाधव,कय्यूम तडवी, दीपक चंडोल, विनोद जाधव, अरुण गवळी मुख्याध्यापक,चांदणे सर,मेमाने सर,मोरे सर, ज्ञानेश्वर मख,सैतवाल सर, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालकवर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोकर लगत झालेल्या अपघातात चार ठार

## सीताखांडी घाटातील घटना; मिनिट्रक व मॅजिकची धडक

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकर-नादेड रस्त्यावरील सिताखांडी लगत असलेल्या वळणावर सोमवारी ( ता.१९ ) सायंकाळी चार वाजताच्या सुमारास भरधाव वेगात जाणा-या मीनीट्रक व मॉझीक वाहनांची समोरासमोर जोराची धडक झाल्याने चार जणांचा जागीच मृत्यू झाला तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत.पोलीस आणि नागरीकानी वेळीच मदतकार्य सुरू केले असून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. भोकरला विटखाली करून मीनीट्रक क्रमांक ( एमएच-१९/९९३ ) हे वाहन भरधाव वेगात नांदेड कडे जाताना नांदेड येथुन प्रवासी घेऊन भोकरकडे येणारी मॅझीक क्रमांक ( एमएच-२६-बीएक्स/३८१५ ) याची सिताखांडी घाटातील वळणावर समोरासमोर जोराची धडक लागून चारजणाचा जागीच मृत्यू झाला असून मयतात संदिप कीसन कीसवे ( वय२६ रा. हळदा ता.भोकर ), बापुराव रामसिंग राठोड( वय६५ रा. पाकी तांडा ता.भोकर ),भूलाबाई गणेश जाधव( वय ४०रा. विरसोनी ता.हिमायतनगर ), संजय ईरबा कदम( वय २५ रा. सिरजंनी, ता. हिमायतनगर ) यांचा समावेश असुन गंभीर जखमींत देवीदास गणेश जाधव( वय२५ रा.पोटातांडा ता.हिमायतनर ),मंगेश गोविंद डुकरे( वय२८ रा.लहानलोण, ता.अर्धापुर ), परमेश्वर केशव महाजन( वय४०रा.विरसोनी ता.हिमायतनगर ),कैलास गणपत गड्डमवाड( वय ४५रा.सिरंजनी ता.हिमायतनगर ) यांचा समावेश आहे.जखमीवर येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक अंनत चव्हाण, वैद्यकीय अधिकारी सागर रेड्डी कीनीकर, वैद्यकीय अधिकारी व्ही.सी.थोरवट, मयूरी कलटवार यानी ऊपचार करून पुढिल उपचारासाठी नांदेडला पाठविण्यात आले आहे.पोलीस उप अधीक्षक ख़ंडेराव धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी शकत आमना , पोलीस निरीक्षक नानासाहेब उबाळे यांनी भेट दिली.



# चार महिने उलटूनही नाफेडकडे शेतकऱ्यांची थकबाकी

## केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारतीताई पवार यांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** चार महिन्यांपूर्वी लाल कांदा दरात घसरण झाल्याने नाफेडने कधी नव्हे ती लाल कांद्याची खरेदी केली. मात्र चार महिने उलटूनही शेतकऱ्यांना कांदा विक्रीचे पैसे मिळाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. मार्च महिन्यात नाफेडने लाल कांद्याची खरेदी फार्मर्स प्रोड्युसर कंपन्यामार्फत केली होती. मात्र ही खरेदी बुडत्याला काडीचा आधार अशीच ठरली. केवळ १८ कोटी रुपये किंमतीचा कांदा खरेदी करुन केंद्र सरकारने डोंगर पोखरून उंदीर काढला होता. या खरेदीने खुल्या बाजारात कांद्याचे भावही वाढले नाहीत. ही खरेदी खुल्या बाजारात होणे अपेक्षित असतांना संबंधित खरेदीदारांनी वशिलेबाजीने आपल्या जवळच्याच शेतकऱ्यांचा कांदा खरेदी केला. जो माल खरेदी केला त्यालाही अल्प दर देण्यात आला. त्यामुळे ही खरेदीची प्रक्रियाच संशयास्पद ठरली. त्यामुळे शेतकऱ्यांनी असंख्य तक्रारी केल्यानंतर मागील वर्षी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारतीताई पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात नाफेडच्या अधिका-यांसमवेत एक बैठक घेऊन चौकशी समिती नेमली होती. मात्र अद्यापही त्या चौकशीचा अहवाल गुलदस्त्यात आहे, तो नागरिकांपुढे आलाच नाही. पुढे त्या चौकशीचे काय झाले? याचा लोकप्रतिनिधींनीही मागोवा घेतला नाही. एकूणच नाफेडच्या खरेदीबाबत शेतकरी अजिबात समाधानी नाहीत. नाफेड नेमकी कुणाची खरेदी करते? किती माल खरेदी करते? हा संशोधनाचा विषय ठरेल.

मार्च महिन्यात कांदा खरेदी केलेल्या शेतकऱ्यांचे अजून दोन ते अडीच कोटी रुपये शेतक-यांचे देणे बाकी आहे. **निखिल पडाडे, उपव्यवस्थापक, नाफेड**

**आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारतीताई पवारांच्या संवेदना हरवल्या?**
नाफेडने चार महीन्यांपासुन शेतकऱ्यांना कांदा विक्रीचे पैसे दिले नाही. याबाबत शेतकऱ्यांनी भारतीताई पवार यांच्या तिन्ही स्वियं सहाय्यकांना अनेकदा अवगत केले. भारतीताई पवार यांच्याशीही अनेकदा संपर्क करण्यात आला मात्र त्यांचेकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे केंद्र सरकारचे प्रतिनिधी म्हणून या प्रश्नाबाबत त्यांना कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून आले त्यामुळे भारतीताई यांच्या शेतकऱ्यांप्रती संवेदना हरवल्या की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

नाफेडच्या खरेदीने कांदा बाजारभावात वाढ होत नाही. जी अल्प खरेदी होते त्यातही वशिलेबाजी होते. जी खरेदी झाली त्याची चार महिने उलटूनही शेतकऱ्यांना अद्यापही देयके मिळाली नाहीत. त्यामुळे नाफेडची ही खरेदी सावकारी स्वरुपाची आहे का? बाजार समित्यांना २४ तासांच्या आत शेतमाल विक्री झाल्यानंतर पैसे देणे बंधनकारक आहे. मग हाच नियम नाफेडला का लागु होत नाही. नाफेड फार्मर्स प्रोड्युसर कंपन्यांमार्फत कांदा खरेदी करते त्यामुळे या कंपन्या सरकारने दलाली खाण्यासाठी नेमल्या आहेत का? इतपत शेतकऱ्यांना शंका यायला लागली आहे. त्यामुळे याबाबत संपूर्ण चौकशी होऊन शेतकऱ्यांना तातडीने देयके देण्यात यावीत अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



# माऊलीच्या पालखीचे आगमन आणि वरुणराजाची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**
**पैठण :** आपेगाव ते पंढरपूर एकूण १८ दिवसाचा पाई प्रवास परंतु या प्रवासात साधारण चाळीस ते पन्नास गाव वस्त्यांवर माऊलीच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी नागरिक अतुरतेने वाट बघतात. यंदा मात्र पालखी सोहळा निघाल्यापासून मृग नक्षत्र कोरडेच गेले. परंतु बीड जिल्यात पाटोदा गावी माऊलीच्या पालखीचा प्रवेश अण सायंकाळी वरून राजानी परंपरा पाळत जोरदार बरसात केली.तब्बल एक तास वादळी वार्यासह पावसाने हजेरी लावल्याने, ८ व्या दिवशी पाटोदा गावी वेशीवर ग्रामस्थांनी हलगी, बँडबाजाच्या निनादात जोरदार फटक्यांची अतिषबाजी करत स्वागत केले. पावसाची वाट पहात बसलेल्या नागरीकांचा उत्साह माऊलीच्या अगमनाने वरुण राजांनी हजेरी लावल्याने हलगीच्या तालावर ठेकाही धरला.

# बिबट्याच्या हल्ल्यात कर्मचारी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** भरधाव दुचाकीच्या धडकेने रस्ता ओलांडत असलेला बिबट्या गंभीर जखमी झाला आहे. दरम्यान आज त्याला उपचारासाठी जेरबंद करण्यासाठी गेलेल्या बचाव पथकातील वन कर्मचाऱ्यावर बिबट्याने हल्ला केल्याने तो जखमी झाला. या बिबट्याला उपचारासाठी नागपूर येथे पाठविण्यात आले तर कर्मचाऱ्याला बुलढाणा येथील रुग्णालयात भरती करण्यात आले. १७ जून रोजी सायंकाळी बुलढाणा – खामगाव मार्गावरील ज्ञानगंगा अभयारण्यातील जुना देव्हारी फाट्या जवळ हा खळबळजनक घटनाक्रम घडला. खामगाव येथील दोन युवक केटीएम बाईकने खामगावच्या दिशेने भरधाव वेगात जात होते.याच वेळी ज्ञानगंगा अभयारण्यात रस्ता ओलांडत असलेल्या बिबट्याला त्यांनी जोरदार धडक दिली. यात बिबट्या गंभीर जखमी झाला तर दुचाकी रस्त्याच्या बाजूला खड्ड्यात जाऊन पडली व दोन्ही युवक देखील जखमी झाले . घटनेची माहिती मिळताच बुलडाणा 'आरएफओ' चेतन राठोड, वनपाल संजय राठोड व इतर वन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी बिबट्या जखमी अवस्थेत दिसून आला तर केटीएम बाईक पडून होती. दुचाकी चालक त्या ठिकाणाहुन निघून गेले होते. जखमी बिबट्याला पकडून उपचार करण्यासाठी बुलडाणा वनविभागाची रेस्क्यू टीम व पशुवैद्यकीय अधिकारी यांना बोलविण्यात आले. मात्र बिबट्या आक्रमक होता व रात्री अंधार 'रेस्क्यू' करणे अशक्य होते.

# मिळेल तिथे चांगले काम करा : शाखाधिकारी उत्तमराव बदाले

## शिवाजी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** दहावी बारावी नंतर नेमके काय करायचे हा प्रश्न जवळपास सर्वच विदयार्थ्यांना व पालकांना पडतो. दहावी बारावी नंतर आपल्या आयुष्याला वळण लावण्यासाठी, भविष्य घडविण्यासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यातल्या त्यात कृषी विभागात सर्वाधिक संधी आहेत. डॉक्टर, इंजिनिअर या क्षेत्रात संधी असल्या तरी भवितव्य असेलच असे नाही. आपल्या हुशारीसोबत कठोर मेहनत करण्याची तयारी ठेवली तर यश हमखास मिळते. बँकिंग क्षेत्रातही आजच्या काळात अनेक संधी आहेत. ठराविक कालावधीत वेगवेगळ्या बँकांमध्ये क्लारिकल आणि ऑफिसर पदांची भरती होत असते. त्यासाठी विविध प्रकारच्या परीक्षा देत चला असे आवाहन एसबीआय बँकेच्या शहर शाखेचे शाखाधिकारी उत्तमराव बदोले यांनी केले आहे.

श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित विविध शाळा, महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोकराव आहेर यांची तर प्रमुख



पाहुणे म्हणून बाबासाहेब मोहिते, कृष्णा पाटील यांची उपस्थिती होती. या वेळी सत्कार करण्यात आलेले विद्यार्थी व शाळा महाविद्यालय या प्रमाणे डॉ. भिमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखा १ ) उदयन संजय जाधव, २ ) किर्तना सुभाष शिरसे, ३ ) रुथा राजेंद्र भालेराव. कला शाखा_१ ) पुजा साईनाथ शिंदे, २ ) ऐश्वर्या किशोर जाधव, ३ ) प्राची संजय आव्हाले वाणिज्य शाखा _१ ) प्रशांत संजय वाघ, २ ) हर्षदा अण्णासाहेब चव्हाण, ३ ) लावण्या संतोष जिबोले रामराव पाटील बहिरगावकर MCVC कनिष्ठ महाविद्यालय. इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी १ ) आदित्य सुभाष जाधव, २ ) रोहित गणेश शिरसे. मेकॅनिकल विभाग १ ) सुनिल ज्ञानेश्वर गायकवाड, २ ) प्रविण मदन गोरे, ३ ) उदय पुंडलिक जाधव. इलेक्ट्रॉनिक विभाग १ ) ज्ञानेश्वर विष्णू पवार, २ ) वैभव दिलीप गायकवाड, ३ ) दुर्गेश घुगे. बाबुराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालय कळंकी ( कन्नड ) १ ) आकांक्षा अण्णासाहेब थोरात, २ ) आरुषी आप्पासाहेब थोरात, २ ) प्रतिक्षा रामदास थोरात. सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय १ ) सारिका प्रकाश पातळे, २ ) वैष्णवी प्रकाश गावंडे, ३ ) प्रणव शंकर शिरसे. उच्च माध्यमिक विद्यालय विज्ञान शाखा १ ) शेख झोया सादिक, २ ) लक्ष्मी किसन राठोड, ३ ) तन्वी शांताराम कापडणे. कला शाखा १ ) शालिनी बाळू किर्तीकर, २ ) सोनाली गंगाराम जाधव, ३ ) कोमल शिंदे. गौताळा व्हॅली स्कूल १ ) सिध्दीका देशमुख, २ ) राजदीप भोसले, ३ ) तन्मय आहेर. आदींचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश खेत्री यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. अभय आहेर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# गड्या आपली जिल्हा परिषदेची शाळा 'लय भारी'

## मुलांना जिल्हा परिषद शाळेतच शिकवण्याचा तलवाडा ग्रामस्थांचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**
**लोणीखुर्द :** खासगी इंग्रजी शाळांचे आकर्षण ग्रामीणमधील पालकांमध्येही आहे. पण, त्या शाळांचे भरमसाठ शुल्क आणि पालकांना इंग्रजी जमत नसल्याने मुलांचा अभ्यास घेण्यात येणाऱ्या अडचणींमुळे पालक आता मुलांना जिल्हा परिषद शाळेतच घालत आहेत. पोषण आहार, पाठ्यपुस्तके यांच्यासह अन्य सोई-सुविधा दिल्यानंतरही जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या घटत आहे. यावर वैजापूर तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामस्थांनी विचार मंथन करण्यात आले आहे. या शाळांचे महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. विशेष म्हणजे,गावातील तरुण सिनियर सिटिजन राजकीय कार्यकर्ते तरुण वर्ग शिक्षण प्रेमी नागरिक यांचा हा प्रयत्न पालकांनाही प्रभावित करीत असून जिल्हा परिषदेच्याच शाळा "लय भारी' असल्याचे वाटू लागले आहे. वैजापुर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचे जाळे आहे. या शाळांमध्ये मोफत पाठ्यपुस्तकांपासून शालेय पोषण आहार देण्यात येतो. प्रशिक्षित शिक्षक वर्ग आणि सुसज्ज इमारती हे या शाळांचे वैशिष्ट्य असतानाही त्या पटसंख्येअभावी ओस पडू लागल्या आहेत. गेल्या वर्षभरामध्ये सेमी इंग्रजी अभ्यासक्रम, सुरू करणे, डिजिटल शाळा, ई लर्निंग असे वेगवेगळे उपक्रम राबवून जिल्हा परिषद आपली पटसंख्या टिकवण्याचा प्रयत्न करत आहे. वैजापूर तालुक्यात पटसंख्या कमी होत आहे. यावर्षी अधिक विद्यार्थी शाळेत



दाखल व्हावेत, यासाठी गावातील व्हॉटसप ग्रुपच्या माध्यमातून चर्चा करून गावातील जेष्ठ नागरिक शिक्षण प्रेमीनागरीक यानी बैठक घेत जिल्हा परिषदेच्या शाळांचे महत्त्व अधोरेखित केले. गावातील शाळेत शिकून मोठ्या पदावर कम करणारे रिटायर्ड शिक्षक यांनी शाळेत मुलांसाठी विविध विषयांवर मार्गदर्शन करणार एसल्याची ग्वाही दिली. तसेच आपली जिल्हापरिषद शाळा किती छान आहे, भविष्यासाठी आम्ही विद्यार्थी घडवतो. मोफत शिक्षण, पाठ्यपुस्तके व गणवेश, स्वच्छ पाणी, स्वतंत्र शौचालय, अनुभवी शिक्षक यांसह शाळेत मिळणाऱ्या सर्व सवलती यांची माहिती जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या वाढावी, गुणवत्ता वाढीसाठी सर्वजण प्रयत्न करीत असल्याने 'गड्या आपली जुनी मराठी शाळाच बरी' असे पालकांचे मत झाले आहे.

यावेळेस विद्यार्थ्यांना माजी.सभापती भागिनाथ मगर यांनी वह्या देण्याचे कबुल केले तर माजी उप सभापती राजेंद्र मगर यांनी दप्तर देणार आसल्याचे सागितले यावेळेस माजी.सरपंच भाऊसाहेब मगर हरिभाऊ मगर.मनोहर मगर बशीर भाई मगर दादाभाऊ मगर ज्ञानेश्वर मगर सुभाष रोकडे संजय आहेर सर बाळासाहेब मगर काकासाहेब मगर किशोर मगर जालींदर शिंदे प्रमोद मगर गोरक शिंदे रहिमख्रा शेख राजु शेख आदिसह शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.

# मुंबई, पुणे, तिरुपती व गोव्याला जाणे झाले सुलभ

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** मुंबई, पुणे, तिरुपती व गोव्याकडे जाणाऱ्या चार साप्ताहिक विशेष गाड्यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रवाशांची सोय होणार आहे. मध्य रेल्वेच्या भुसावळ विभाग प्रबंधक कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार, ०११२७ एलटीटी- बल्लारशाह विशेष गाडी २६ सप्टेंबरपर्यंत दर मंगळवारी लोकमान्य टिळक टर्मिनन्स मुंबई येथून प्रस्थान करणार आहे. ही गाडी दर बुधवारी स.६:५२ वाजता अकोला स्थानकावर येऊन बल्लारशाहकडे रवाना होईल. परतीच्या प्रवासात ०११२८ बल्लारशाह-एलटीटी ही गाडी २७ मार्चपर्यंत दर बुधवारी बल्लारशाह येथून प्रस्थान करणार आहे. ही गाडी दर बुधवारी सायं. ७:२७ वाजता अकोला स्थानकावर येऊन मुंबईकडे रवाना होणार आहे. ०७६०५/०७ तिरूपती-अकोला-तिरुपती या साप्ताहिक विशेष गाडीला २७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. ०११३९ नागपूर-मडगाव विशेष रेल्वेला ३० सप्टेंबरपर्यंत मुदत वाढ देण्यात आली. ०११४० मडगाव-नागपूर विशेष रेल्वे गाडीला १ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. ०१४३९ पुणे-अमरावती द्वि-साप्ताहिक विशेष गाडीला ३० जुलैपर्यंत, तर ०१४४० अमरावती पुणे द्वि-साप्ताहिक विशेष गाडी ३१ जुलैपर्यंत धावेल

# शहादा येथे भव्य श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**शहादा :** श्री श्री नारायण पुरम तीर्थ शहादा येथे भव्य श्री विष्णू नारायण मंदिर नारायण भक्ती पंथाचे संस्थापक आचार्य संतश्रेष्ठ श्री लोकेशानंदजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली निर्माण होत आहे. नारायण भक्ती पंथाद्वारे विविध भक्ती महोत्सवांचे आयोजन वर्षभरात करण्यात येत असते.याचाच एक भाग गेल्या चार वर्षांपासून श्री श्री नारायण पुरम तीर्थ, शहादा द्वारा शहादा नगरीत श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात येत असून महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान येथील विष्णू भक्त यात मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. यावर्षी दि.20जुन रोजी भव्य श्री जगन्नाथ रथयात्रा काढण्यात येणार आहे. शास्त्र काय म्हणते ? श्री जगन्नाथ रथयात्रेचे शास्त्रात अनन्य साधारण महत्व मांडलेले आहे.यात जे भक्त रथयात्रेत ध्वजाची सेवा करतो त्याची किर्ती सर्वत्र होते.जे भक्त छत्र आणि पंख्याची सेवा देतात त्यांना राजयोग प्राप्त होतो. जे विष्णू भक्त भंगवंताचे आयुध घेऊन चालतात त्यांचे शत्रू नाहिसे होतात. विशेषता जे भाविक श्री जगन्नाथांचे रथ ओढतात त्यांना शेकडो यज्ञाचे पुण्य फळ प्राप्त होते. या रथयात्रेचे वैशिष्ट्य असे की, श्री जगन्नाथ जी सदैव माता लक्ष्मी यांच्या समवेत असतात परंतु, या रथयात्रेत भगवान जगन्नाथजी बंधू बलराम आणि बहिण सुभद्रा यांच्या सोबतीने नगर भ्रमण करतात. जे अबाल -वृध्द, अपंग भक्त प्रत्यक्ष मंदिरात जाऊन भंगवंताचे दर्शन लाभ घेऊ शकत नाहीत त्या भक्तांना भेटण्यासाठी भगवान श्री जगन्नाथ स्वतः आपल्या भावंडासमवेत भक्तांच्या भेटीला रथात बसून नगर भ्रमण करतात.श्री श्री नारायण पुरम तीर्थ शहादा द्वारा श्री जगन्नाथ रथयात्रेची सुरुवात श्री सप्तशृंगी मातेच्या मंदिरापासून एस.बी. आय.चौक ,बस स्थानक, गांधी पुतळा , डोंगरगाव रस्त्यावरील अहिंसा चौकातून पुढे दादावाडी जवळ समाप्त होईल.शहादा शहरातील सर्व भक्तांनी सहभागी होऊन श्री जगन्नाथ रथयात्रेचे दर्शन लाभ घ्यावे असे आवाहन श्री नारायण भक्ती पंथ शहादा द्वारा करण्यात आले आहे.

# समृद्धीने तोडले 67 वर्षांचे रेकॉर्ड : शिक्षक अतुल पाटील यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज



**पिलीव :** सर्वच पालकांना त्यांची मुले ज्या शिक्षकांकडे शिकतात त्या शिक्षकांकडून खूप अपेक्षा असतात. जसे आई-वडील मुलांसाठी वेगवेगळ्या भूमिका पार पाडत असतात त्यापद्धतीनेच शिक्षक देखील विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये वर्ग आणि खेळाच्या मैदानात पर्यंत वेगवेगळ्या भूमिका पार पाडत असतात.विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी एखादे आपवाद वगळता प्रत्येक शिक्षक विविध प्रकारचे प्रयत्न करत असतात. भविष्यामध्ये एक चांगला विद्यार्थी घडावा यासाठी शिक्षक सर्वतोपरी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांसह स्वतःच्या जीवनात देखील ठरवलले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ते नेहमी झटत असतात.याचीच प्रचीती दिसून आली आहे ती माळशिरस तालुक्यातील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालतील इयत्ता दहावीचे वर्ग शिक्षक श्री.अतुल पाटील सर यांच्या मध्ये.

याचे झालेय असे कि पिलीव येथील कर्मवीर विद्यालयामध्ये इयत्ता दहावीमध्ये शिकत असलेली कु.समृद्धी मनोज पंडीत ही मुळची उस्मानाबादची परंतु पिलीव हे तिच्या मामाचे गाव तिचे मामा शशिकांत महामुनी यांचेकडे ती आठवीत असल्यापासून राहत आहे. समृद्धीने मामाच्या गावात राहून इयत्ता दहावीमध्ये तब्बल 99.20% गुण मिळवून पिलीव शाळेचे आजपर्यंतचे रेकॉर्ड मोडले आहे. समृध्दीने रेकॉर्ड ब्रेक गुण मिळवून आपल्या गावाचे, मामाचे, वर्ग शिक्षकाचे व आई-वडीलांचे नाव रोशन केले आहे.आपल्या मुलीने बाहेरगावी राहूनही इतके गुण मिळविले त्याचे श्रेय वर्ग शिक्षक श्री.अतुल पाटील यांना देत समृद्धीचे वडील मनोज पंडीत, आई सविता पंडीत अजोबा श्रीधर महामुनी, आज्जी छाया महामुनी यांनी अतुल पाटील सर यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा यथोचित सन्मान केला.व प्रत्येक विद्यार्थ्यांनी समृद्धीचा व प्रत्येक वर्ग शिक्षकाने श्री.अतुल पाटील सर यांचा आदर्श घ्यावा आशी समृद्धीच्या आई-वडीलांनी अपेक्षा व्यक्त केली.



# खांडी पिंपळगाव येथे निर्धूर चुलीचे वाटप

## आ. सतीश चव्हाण व भानुदास चव्हाण प्रतिष्ठान यांचा स्तुत्य उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

सुधाकर जेठे

**खुलताबाद :** तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथे भानुदास चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने खांडी पिंपळगाव येथे गोरगरीब गरजू नागरिकांना आ. सतीश चव्हाण यांच्या पुढाकारातून मिठू महालकर जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी औरंगाबाद खांडी पिंपळगाव येथे यांच्या हस्ते निर्धूर चुलीचे वाटप करण्यात आले. या वेळी महेश उबाळे विधानसभा अध्यक्ष गंगापूर खुलताबाद निर्धूर चुलीचे वैशिष्ट्य म्हणजे पारंपारिक चुलीपेक्षा या चुलीला पन्नास टक्के पेक्षा कमी इंधन लागते शिवाय या धुराचे प्रमाण असल्याने कुटुंबांचे आरोग्य व पर्यावरणाच्या दृष्टीने ही चूल नक्कीच फायदेशीर असल्याने जास्तीत जास्त गरजू महिलांनी याचा वापर करा स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले जात आहे राजकारणासोबत समाजकारण करण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रत्येकाच्या घराघरात पोहोचला आहे महिलांना प्राधान्य देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस करत आहे यावेळी मा.सरपंच अशोक उबाळे कारभारी महालकर विजय श्रीखंडे तुकाराम महालकर गणेश शिंदे कल्याण श्रीखंडे चांद भाई गंगाधर कोकणे हरिदास उबाळे विजय महालकर सोमीनाथ उबाळे काकासाहेब उबाळे शरद कोकणे बाबासाहेब श्रीखंडे कैलास महालकर राजू श्रीखंडे आदी गावकरी उपस्थित होते.


# तरुणाने भावाला मेसेज करत केली आत्महत्या



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बोडखा या गावात भावाच्या फोनवर शेवटचा मेसेज दिल्यानंतर २२ वर्षीय तरुणाने विहिरीत उडी घेऊन जीवन संपवले. अमोल शेखू पड्सवान ( 22 वर्षे ) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. अमोलने शनिवारी भावाला 'माझ्यामुळे सर्वांना त्रास झाला, आता माझ्यामुळे कोणाला त्रास होणार नाही', असा संदेश पाठवला. अमोलचा मेसेज वाचून त्याचा भाऊ व मित्रांनी त्याचा शोध सुरू केला. त्याची मोटारसायकल विहिरीजवळ उभी असलेली दिसली. माहिती मिळताच चौकी जमादार नवनाथ कोल्हे, संतोष भालेराव, प्रकाश ठोकळ यांनी घटनास्थळ गाठून 2 वाजता मृतदेह बाहेर काढण्यात आले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद





# १९९० मधील दहाव्या वर्गातील वर्गमित्रांचा गेट-टुगेदर कार्यक्रम नांदेड येथे उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शालेय जीवन म्हणजे आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा. मित्र-मैत्रीणी आणि शिक्षक यांच्या समवेत घालवलेले ते सुंदर, सुखद दिवस. पण आपण मोठे झाल्यावर ते सगळे आपल्यापासून दूर जातात. म्हणूनच आम्हा सगळ्यांना शेवटी ओढ लागली ती पुन्हा आपल्या मित्र-मैत्रीणींना, शिक्षकांना भेटण्याची. आम्ही सारे श्री संत गाडगे महाराज विद्यालय लोहा या शाळेतील १९९०-९१मध्ये इयत्ता दहावी 'अ' 'ब' 'क'मध्ये शिकलेले सर्व मित्रमंडळी फेसबुक आणि व्हॉटसअपच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आलो. आम्हा सर्वांना एकत्र आणण्याचं काम नारायण गोणे, किरण महाजन ,कैलास अमिलकंठवार, लक्ष्मण कांजले, विकास देबडवार या मित्राने केलं. सर्व मनापासून तयारीला लागले. प्रेमाची भेट देण्यापर्यंत व नृत्यापासून जेवण-खाण्यापर्यंत सर्व गोष्टींचे नीट नियोजन झालं. तेहतिस वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर प्रत्यक्ष 18 जुन कधी उजाडतंय, असंच सर्वांना वाटत होतं. शेवटी तो दिवस उजाडला. हॉटेल पद्मावती ग्रँड मालेगाव रोड नांदेड येथे सर्वांचं जंगी स्वागत केलं. रांगोळीने सर्वांचे मन मोहून टाकले. त्यानंतर कार्यक्रमाची सुरूवात दिप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. कार्यक्रमाची सूत्र संचलन माधव फुलवळे यांनी सांभाळली. कार्यक्रम प्रास्तविक लक्ष्मण कांजले यांनी केले .मैत्री या विषयावर बालाजी सोनवळे व कल्पना चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.अतिशय आनंदी उत्साहाचं वातावरण होतं. आमच्या बॅचचे वैशिष्ट्य म्हणजे अतिशय हुशार विद्यार्थ्यांची बॅच. शिवाय आमचा वर्ग खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम सर्वात अग्रेसर होता. सर्वांनी जुन्या आठवणी आणि बालपणीचे किस्से सांगितले. कधी हसून पुरेवाट झाली तर कधी मन खट्टू झालं. विद्यार्थी आपलं मनोगत व्यक्त केलं. कार्यक्रम पार पाडण्यासाठी मोहन पवार, डॉ. सचिन दळवे,दिनेश मोठे,अप्पाराव पवार,संगीता चुडावकर वंदना दमकोंडवार, उषा धुळगंडे, पद्मजा शिंदे,कल्पना चव्हाण या मित्र-मैत्रीणींनी विशेष सहकार्य केलं.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या
स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)
पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.
फीस - 300 रू.
संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध
पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.



# कन्नड शहरात उद्योजक मनोज पवार यांनी सुरू केले पाण्याचे टँकर

## तहसीलदार यांनी फीत कापून दिला हिरवा कंदील

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात पाणी टंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन उदयोजक मनोज पवार यांनी स्वःखर्चाने पाण्याचे टँकर सुरू केले. पिशोर नाका येथे तहसीलदार विदयाचरण कडवकर यांनी फित कापून हिरवा कंदील देऊन पाणी पुरवठा सुरू केला. कन्नड शहरात सध्या पाण्यावरून वातावरण चांगल तापलेचे दिसुन येत आहे विविध संघटना निवेदन तसेच पाण्यासाठी आक्रमक होतांना दिसुन येत आहे. मात्र प्रशासक नंदकिशोर भोंबे यांना साधा घाम सुध्दा फुटत नाही, असे चित्र दिसुन येत भोंबे नेहमी गैरहजर राहतात, अशी ही जोरदार चर्चा सुरू आहे. यामुळे पाण्याची समस्या दिवसा न दिवस वाढ होतांना दिसुन येत आहे याच गांभीर्य लक्षात घेऊन उदयोजक मनोज पवार यांनी स्वह खर्चाने कन्नड शहरासाठी चार पाण्याचे टॅकर सुरू केले आहे आता शहरातील नागरीकांना पाणी मिळणार असल्याने नागरीकांमध्ये आनंदाच वातावरण दिसुन येत आहे. यावेळी तहसीलदार विदयाचर कडवकर, योगेश पवार, मनोज देशमुख, सोमनाथ दाभाडे, संदिप नरवडे, पवन ठाकुर, संतोष पवार ,अशोक वाहुळ, रुपेश भारूका, नितिन भारूका, सोपान शिरसाठ, योगेश त्रिभवन, संदेश पवार, बंटी जाधव तसेच महीलांचीही उपस्थीती होती.

# मोकाट कुत्र्यांसंदर्भात आयुक्तांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात मोकाट कुत्र्यांचा वावर व हैदोस मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच प्रत्येक चौकात मोकाट कुत्रे जमावाने वावरतांना आढळून येतात. त्यामुळे शहरातील वाहतुकीला त्रास होत आहे असा आरोपही करण्यात आला तसेच पायी जाणारे, दुचाकीवर प्रवास करणारे नागरीकांना जीव मुठीत घेवून मार्ग काढावे लागते. कित्येक वेळा हे कुत्रे नागरीकांवर हल्ला देखील करतात असे ह्या ठिकाणी सांगण्यात आले त्यामध्ये अनेकवेळा नागरीक, लहान बालके हे जखमी झालेले आहेत. शहरातील मुख्यतः अल्पसंख्याक वॉर्डात मोकाट कुत्र्यांचा त्रास अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. ह्या निवेदनाव्दारे विनंती करण्यात आली की, धुळे शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कुत्रे पकडण्याची मोहिम सुरु करण्यात यावी किंवा कुत्रे पकडणाऱ्या ठेकेदारास ठेका देण्यात यावा व नागरीकांना मोकाट कुत्र्यांच्या त्रासापासून मुक्त करावे अशी विनंती करण्यात आले.येत्या ८ दिवसांत योग्य ती कार्यवाही न झाल्यास नाईलाजास्तव आम्हाला आपल्या धुळे महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशव्दारावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, अर्बन सेलच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असे या ठिकाणी आवाहन करण्यात आले .



# सावित्री, जिजाऊ, अहिल्या, रमाई यांचे अनुकरण केल्यास जीवन सार्थकी : प्रा. इंगळे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** पुरुष आणि महिला हे संसार रथाची दोन चाके आहेत. दोघांनीही सामंज्याशाने एकमेकांना समजून घेतल्यास संसारात अडीअडचणी येत नाहीत.कुटुंबासाठी आणि उज्वल भविष्यासाठी बचत ही फार गरजेची असते. पुरुष हे बचत कमी करत असले तरी महिला मात्र सातत्याने बचतीचा मार्ग अवलंबत असतात. आता दोन हजाराच्या नोटा बंद होत असल्या तरी महिलांजवळच या नात्या माध्यमातून दोन हजाराच्या नोटा असतीलच. यावरून महिलाच बचत जास्तकरते आहे हे सिद्ध होते. महिला आर्थिक विकास मंडळांनी सुद्धा बचत गटांच्या माध्यमातून आपणा महिलांना एक प्रगतीचा उन्नतीचा मार्ग दिला आहे. आपण महिला सिने अभिनेत्री रेखा, माधुरी अशा नट्यांचं अनुकरण न करता क्रांतीज्योती सावित्री, राष्ट्रमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई ,माता रमाई यांच्या जीवन चरित्राचे अनुकरण केल्यास आपलं जीवन सुद्धा सार्थकी लागते",असे प्रतिपादन लोकसंचालित साधन केंद्राच्या माजी अध्यक्ष प्रा. कल्पनाताई इंगळे यांनी केले. त्या महिला आर्थिक विकास मंडळाच्या लोकसंचालित साधन केंद्राच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिनांक १७ जून रोजी स्थानिक संत सखाराम महाराज मंगल भवन येथे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. लोकसंचालित साधन केंद्राच्या अध्यक्ष सौ. गंगाताई वाघ ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. तालुक्यातील ३९




गावांमधील ४१६ महिला बचत गटामधील महिला सदस्यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. यामध्ये मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आले. सन २०२२-२३ चा वार्षिक आढावा तसेच सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक वाचन करण्यात आले. सन २०२३-२४ चा बिजनेस प्लॅन सुद्धा यावेळी सादर करण्यात आला. तसेच २०२३-२४च्या बँक लिकेज नियोजनास मंजुरी सुद्धा ह्या वार्षिक आढावा बैठकीमध्ये देण्यात आली.
आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या नेहा पाटील मॅडम यांनी बचत गटांच्या कार्याबद्दल आणि बचत गटांच्या कर्जाबाबत विस्तृत माहिती यावेळी विशद केली. रुपये दहा लक्ष पर्यंत कर्ज वाटप बचत गटांना केले जाते, हे पण त्यांनी यावेळी सांगितले. वैद्यकीय अधिकारी डॉ. नीता पुंडे यांनी महिलांमधील रक्ताची कमतरता आणि महिलांमधील आजार आणि त्याच्यावर उपाय व औषधोपचार या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

# पूर्णा नदीकाठचे व तळणी परिसरातील वाळू साठे जप्त करून कारवाई करण्यात यावी

## मनसेचे प्रकाश सोळंके यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा -तळणी :** जालना जिल्ह्यातील तालुका मंठा येथील



पुर्णा नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणावर वाळूचे साठे केलेले आहे. नवीन तहसीलदार रुजू झाल्यानंतर त्यांनी रात्री दोनच्या सुमारास वाळू वाहतूक करणारे वाहन पकडून कारवाई केली, या पूर्णा नदीच्या परिसरात अनेक ठिकाणी वाळूचे साठे आहेत हे साठे जप्त करताना उपविभागीय अधिकारी गौण खनिज जालना व उपविभागीय अधिकारी परतुर यांनी मंठा तहसीलदार यांना कारवाई करण्यासाठी यांच्या सहकार्याची गरज आहे. कारण संयुक्तिक कारवाई झालीच पाहिजे. पुर्णा नदीच्या काठच्या टाकळखोपा,भवन, वझर, किर्ला, केंधळे पोखरी, दुधा, सासखेडा,निमखेडा, देवठाणा, उसवद, तळणी या गावांच्या परिसरामध्ये वाळूची चोरी करून साठे बाजी केलेली आहे, मंडळ अधिकारी व संबंधित तलाठी यांनी मुद्दाम दुर्लक्ष केल्यामुळे, नवीन तहसीलदार रुजू होईपर्यंत कोट्यावधी रुपयांची वाळू चोरीला गेली आहे. परंतु पुर्णा नदीकाठावरील गावांच्या परिसरामध्ये मोठ मोठे वाळूचे साठे करून ठेवलेले आहेत हे जप्त करून ज्या शेतकऱ्यांनी वाळु साठा करण्यासाठी जागा दिली,व वाळू वाहतुकीसाठी रस्ता दिला. त्या शेतकऱ्यांच्या सातबारावर बोजा टाकून व महसूल कर्मचारी, तळणी बीट पोलीस कर्मचारी, संबंधित शेतकरी, वन विभागाचे अधिकारी, त्यांच्यावर कारवाई करून, गौण खनिज उत्खनन करून अवैधरीत्या वाळू उपसा, अवैध्य रेती वाहतूक करणाऱ्यांवर मोका कायद्याअंतर्गत, महसूल कर्मचाऱ्यांनी मुद्दामहून दुर्लक्ष केले म्हणून बडतर्फ, पोलिसांनी वाळू चोरांना लोकेशन दिले, म्हणून तत्काळ बदल्या करून त्या बीट जमादार तळणी व त्यांचे सहकारी यांचे मोबाईल तपासण्या करून कारवाई करण्यात यावी, ज्या शेतकऱ्यांनी वाळू चोरीसाठी रस्ता दिला,वाळु साठवण करण्यासाठी जमीन दिले म्हणून सातबारावर बोजा टाकून कारवाई करण्यात यावी, तळणी येथे व पूर्णा नदीच्या परिसरात वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी वाळू साठवण करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. याकडे दुर्लक्ष केले म्हणून वनीकरण मंठा फॉरेस्टी अधिकारी तत्काळ निलंबित करण्यात यावे, या संबंधित महसूल कर्मचारी पोलीस वन विभाग संबंधित शेतकरी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# पोलीस मुख्यालय तलाव गाळमुक्त

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जिल्हा प्रशासन व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त गाळ मुक्त अभियान कार्यक्रमा अंतर्गत पोलिस अधीक्षक कार्यालय जालना येथील तलाव गाळ मुक्त करून ठीक ठिकानि पानी अडवान्यासाठी व्यवस्था करण्यात आली या सर्व कामाच्या ठिकानि प्रत्यक्ष भेट पोलीस अधीक्षक श्री तुषार दोशी व भारतीय जैन संघटना जिल्हा अध्यक्ष श्री दिनेश राका यानी दिली यावेळी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

या भेट दरम्यान श्री दोशी साहेब यांना संघटनेचे उद्देश युवती सक्षमीकरण, तलाव गाळ मुक्त ,वृक्षारोपण संकल्प, मूल्यवर्धन शिक्षण संदर्भित चर्चा करण्यात आली यावेळी पोलीस मुख्यालय परिसरात 500 वृक्षारोपण करण्याचे राका यांनी सांगितले या दरम्यान विनय कुमार कोठारी विजय सुराणा यानी शहरातील पोलिस गस्त बाबत चर्चा केली धनराज जैन यानी जैन मंदिरातील चोरी चा तपास जलद करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. नरेंद्र जोगड यांनी नूतन पोलीस अधीक्षक श्री दोशी जालना जिल्हा पोलीस अधीक्षक पदी रुजू झाल्याबद्दल अभिनंदन केले. संपूर्ण कार्य हे पानी स्तर वाढवने साठी महत्वपूर्ण आहे, असे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यानी सांगितले.



# खामगाव येथे दुसरे शिव बाल, किशोर, युवा मराठी संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर जिल्हा जळगावचे दुसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन 27 ऑगस्ट 2023 रोजी ए.के. नॅशनल हायस्कूल, खामगाव येथे आयोजित करणार असल्याचे फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी कळविले आहे यासंदर्भात नुकतीच ए.के. नॅशनल हायस्कूल येथे या संमेलनाच्या संदर्भात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते या सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रविणा शाह होत्या तर देशोन्नतीचे बुलढाणा जिल्हा आवृत्तीची संपादक श्री राजेश राजोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते तसेच शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य प्रसिद्धीप्रमुख ह. भ. प. शंकर महाराज राजपूत फाउंडेशनचे आजीव सभासद कवी प्रा. देवबा शिवाजी पाटील बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख प्राचार्य डॉ.पंढरीनाथ शेळके जिल्हा समन्वयक श्री पांडुरंग दैवज्ञ जिल्हा अध्यक्ष शाहीर मनोहर पवार जिल्हा समन्वयक शितलताई शेगोकार जिल्हा संघटक डॉ. निवृत्तीभाऊ जाधव जिल्हा प्रसिद्धीप्रमुख श्री विजय बुडूखले जळगाव जिल्हा शाखेचे सल्लागार श्री मधुकर पोतदार श्री गोपाळ उज्जैनकर, गजानन मांडवेकर ,पूजा खेते मॅडम छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख अँड सर्जेराव साळवे आदी उज्जैनकर फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी या पत्रकार परिषदेमध्ये उपस्थित होते यावप्रसंगी राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला ए.के. नॅशनल विद्यालयाच्या प्राचार्या तथा या सभेच्या अध्यक्षा डॉ. प्राचार्य डॉ. प्रवीना शाह यांनी पुष्पहार अर्पण करून सर्व मान्यवरांनी पूजन केले. प्रसंगी प्रथम संमेलनाच्या नियोजना विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

प्रसंगी देशोन्नतीचे बुलढाणा जिल्हा आवृत्तीचे संपादक श्री राजेश राजोरे यांनी उज्जैनकर फाउंडेशनचे दुसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन आपल्या ए.के. नॅशनल हायस्कूल खामगाव या ठिकाणी आयोजित केल्याबद्दल त्यासाठी सर्वतोपरि सहकार्य करण्याचे व संमेलन यशस्वी करण्याचे आश्वासन दिले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. प्रवीना शाह म्हणाल्या की आमच्या विद्यालयामध्ये हे संमेलन पहिलेच असून माझी सुद्धा इच्छा बाल,किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी घेण्याची अशी मनापासून इच्छा होती ती इच्छा आज पूर्ण होत आहे त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले यावप्रसंगी प्रास्ताविक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी केले यावप्रसंगी त्यांनी विविध ठिकाणी आयोजित संमेलनाविषयी माहिती दिली यावप्रसंगी सर्व पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या सभेचे सूत्रसंचालन फाउंडेशनचे बुलढाणा जिल्हा शाखा अध्यक्ष शाहीर मनोहर पवार यांनी केले तर शेवटी आभार फाउंडेशनचे बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख प्राचार्य डॉ. पंढरीनाथ शेळके यांनी केले.





# लेखक कुसनाळे यांना साहित्य भूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**विरार(प.) :** साथी नाट्य कला प्रतिष्ठान,ठाणे यांच्यावतीने लेखक सचिन कुसनाळे यांना साहित्य भूषण या पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. साथी नाट्य कला प्रतिष्ठानच्यावतीने विरार येथे साहित्य व कला क्षेत्रातील मान्यवरांचा राज्यस्तरीय सन्मान सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व कोकण साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष साहित्यिक श्री उमाकांत वाघ यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री नटराज मोरे व सचिव सौ. अनुराधा धामोडे यांच्यासह कार्यकारिणीने ही निवड केली.लेखक सचिन कुसनाळे यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या व्यवस्थापनविषयक 'स्वातंत्र्यायण' हे पुस्तक तसेच आधुनिक पार्श्वभूमीवर विश्ववादाची नवसंकल्पना मांडणारे 'विश्ववाद' या पुस्तकासह अनेक वैचारिक पुस्तकांचे लेखन केले आहे.त्यांच्या एकूण मौलिक लेखन कार्याबद्दल त्यांना साथी प्रतिष्ठानच्यावतीने 'साहित्य भूषण' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

# वारजे भागात कोयता गँगची पुन्हा दहशत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शहरात कोयता गँगने उच्छाद मांडला आहे. कोयता गँगमधील सराईत गुन्हेगार हे वाहनांची तोडफोड करुन दहशत माजवित आहेत. वारजे भागात कोयता गँगने दहशत माजविली असून, खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत पोलीस आयुक्त रितेश कुमार यांच्याशी चर्चा केली. या भागातील गुन्हेगारी रोखण्यासाठी गृहमंत्र्यांनी आदेश द्यावेत, अशी मागणी सुळे यांनी केली आहे. गेल्या काही महिन्यापासून पुणे शहर परिसरात नागरिकांच्या गाड्या फोडणे, धमकावून मारहाण करणे, दहशत माजविण्याचे प्रकार सुरु आहेत. वारजे भागात कोयता गँगने दहशत माजविली आहे. दहशतीच्या घटनांची दखल घेऊन खासदार सुप्रिया सुळे यांनी पोलीस आयुक्त रितेश कुमार यांच्याशी चर्चा केली.पुणे शहर, परिसरात वाढलेल्या गुन्हेगारीवर वचक बसविण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज आहे.

# अवैध दारू विक्री करणाऱ्यावर सेनगाव पोलिसांची कारवाई

## वेगवेगळ्या कारवाईत 45,100 रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**गणेश सुतार**

**सेनगाव :** ठाणे हद्दीत चौघा विरुद्ध अवैध वेगवेगळ्या दारू विक्रेत्यावर सेनगाव पोलिसाची कारवाई झाली असून या कारवाई मध्ये एकूण 45,100 रुपयाचा मुद्देमाल सेनगाव पोलिसांनी जप्त केला आहे सेनगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रंजीत भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली चार ठिकाणच्या वेगवेगळ्या कारवाईत अवैध चोरटी व बेकायदेशीर रित्या दारू विक्री करणाऱ्या वर दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून वेगवेगळ्या ठिकाणाहून एकूण 45,100 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे त्यामध्ये तालुक्यातील वझर कुटे येथील एका आरोपीकडून कापडसिनगी ते बन रोड वझर कुटे पाटी जवळ देशी दारू भिंगरी 180 मिली काचेच्या 19 बाटलाची किंमत100 रुपये प्रमाणे 1900 चा मुद्देमाल जप्त तसेच खडकी येथील एका आरोपीकडून खडकी ते हिवरखेडा रोडवर मोकळ्या जागेत खडकी शिवारात एका लाईलोनच्या पिशवीमध्ये देशी दारूच्या 180 मिली काचेच्या 40 सीलबंद बोटला ज्याची 70 प्रमाणे अंदाजे किंमत असा एकूण 2800 रुपयांचा मुद्देमाल जप्त तसेच वझर कुटे पाटील जवळ निसर्ग धाब्याजवळ एका आरोपीकडून देशी दारू 180 मीलीच्या 15 बॉटल 100 प्रमाणे 1500 व तसेच इम्पेरियल ब्ल्यू असे लेबल असलेले 180 मि.लि. शील बंद काचेच्या 5 बॉटल 180 रुपये प्रमाणे 900 रुपये असा एकूण 2400 रुपये चा प्रोबीशनल गुन्ह्याचा माल जप्त करण्यात आला तसेच सेनगाव टी पॉईंट ते बस स्थानक समोरील एका आरोपी कडून 30 देशी दारूच्या बॉटल प्रत्येकी किंमत 100 रू.प्रमाणे 3000 रुपये एकूण मुद्देमाल एका काळ्य रंगाची हिरो कंपनीची फॅशन प्रो MH 38 यु 3969 ज्याची किंमत 35000 रू असा या प्रकरणात एकूण 38000 रू.मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे व आरोपी विरुद्ध कलम 65( अ ) नुसार गुन्हा नोंद झाला आहे आरोपीने स्वतःच्या फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशीर रित्या देशी दारू भिंगरी संत्रा या कंपनीची चोरटी दारू बेकायदेशीर रित्या आपापल्या गावात चोरटी विक्री करत असताना व आढळून आल्याने यांच्याविरुद्ध सेनगाव पोलीस ठाणे अंतर्गत महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत कलम 65 ( ई )( अ ) अंतर्गत कारवाई करण्यात आली असून या कारवाई मध्ये आरोपीकडून 45,100 रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये सेनगाव पोलिसांकडून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे या कारवाई मध्ये सेनगाव पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक रंजीत भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या ठिकानी कारवाई केली असून त्यामध्ये वझर कुटे या ठिकाणी ओमनाथ राठोड यांच्या फिर्यादीवरून एका आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणाचा तपास पोलीस नाईक एस एन खांडेकर यांच्याकडे दिला आहे असून तसेच खडकी या ठिकाणी सतीश ठेंगे पोलीस उपनिरीक्षक यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद झाला असून तपास जे. यश मस्के यांच्याकडे दिला आहे तसेच. वझर कुटे या ठिकाणी शिवदर्शन खांडेकर यांच्या फिर्यादीवरून एका आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद झाला असून या प्रकरणाचा तपास एस एन खांडेकर यांच्याकडे दिला आहे तसेच सेनगाव टी पॉईंट बस स्थानक दरम्यान पोलीस कॉन्स्टेबल संतोष जाधव यांच्या फिर्यादीवरून वटकळी येथील एका आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणाचा पुढील तपास बीट अमलदार सुभाष चव्हाण यांच्या कडे दिला असून या संपूर्ण वेगवेगळ्या कारवाईत सेनगाव पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस करत आहेत.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर